# तुलनात्मक आधुनिक राजकीय व्यवस्था ई—संदर्भग्रंथ मालिका

## भाग २

## स्विझर्लंडची राजकीय व्यवस्था

लेखक
डॉ. निलेश र. निंबाळकर

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

तुलनात्मक आधुनिक राजकीय व्यवस्था ई—संदर्भग्रंथ मालिका
भाग २
स्विझर्लंडची राजकीय व्यवस्था

© डॉ. निलेश र. निंबाळकर
सहयोगी प्रोफेसर,
एम.ए, एम फिल, पीएचडी, सेट
श्री.कृ.को. महाविद्यालय जळगाव (जा.) बुलढाणा

❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**
H.P. Office (Source By Google)

❖ **Edition: Jan. 2021**

**ISBN** 978-93-85882-65-4

❖ **Price : 200/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

## लेखकाचे मनोगत

आजच्या आधुनिक काळामध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा अंतर्गत विविध राजकीय व्यवस्थांचा तुलनात्मक अध्ययन आला महत्त्व प्राप्त झालेले आहे करुणा महामारी च्या पार्श्वभूमीवर आभासी पद्धतीने अभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले असून त्या दृष्टिकोनातून आभासी स्वरूपामध्ये विविध राजकीय व्यवस्थापन संदर्भ ग्रंथाच्या माध्यमातून अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याचा लेखकाचा मनोदय आहे आणि त्या भूमिकेतून लेखकाने तुलनात्मक राजकीय व्यवस्थांचा अभ्यास संदर्भग्रंथ ही विविध राजकीय व्यवस्थांचा समावेश असलेली मालिका प्रकाशित करण्याचे ठरविले आहे त्याअंतर्गत स्विझरलँड ची राजकीय व्यवस्था भाग २ प्रकाशित करण्यात येत आहे

विविध विद्यापीठाअंतर्गत राज्यशास्त्र विषयाचे अध्ययन करणारी विद्यार्थी विद्यार्थिनी तसेच स्पर्धा परीक्षांकरिता स्वित्झर्लंड राजकीय व्यवस्थेचा अभ्यास आवश्यक आहे आजच्या काळामध्ये स्पर्धात्मक युगात अंतर्गत विश्लेषणात्मक अभ्यासाबरोबरच वस्तुनिष्ठ स्वरूपामध्ये विद्यार्थ्यांना तयारी करावी लागते आणि त्या दृष्टिकोनातून वस्तुनिष्ठ प्रश्नांचा सराव सुद्धा आवश्यक ठरतो

मला विश्वास आहे की स्वित्झर्लंडची राजकीय व्यवस्था ही संदर्भ ई—पुस्तिका या दृष्टिकोनातून निश्र्चितच विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल कारण या अंतर्गत स्वित्झर्लंडचे संविधान व शासन व्यवस्थेचा संक्षिप्त स्वरूपामध्ये आढावा घेण्यात आलेला असून वस्तुनिष्ठ प्रश्नांचा सुद्धा अंतर्भाव स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेला आहे अतिशय कमी वेळामध्ये या ई—पुस्तिकेच्या माध्यमातून आपण स्वित्झर्लंडच्या शासन व्यवस्थेचा आढावा घेऊ शकतो

स्वित्झर्लंडच्या शासन व्यवस्था व्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने स्वित्झर्लंडच्या राजकीय व्यवस्था ही ई—पुस्तिका आज करोना महामारी च्या पार्श्वभूमीवर जेव्हा सगळीकडे ग्रंथालय हे बंद आहेत

अशा काळामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन स्वरूपात या ई—पुस्तिकेच्या माध्यमातून आपले अध्ययन करता येईल या ई—पुस्तिकेच्या निर्मिती करता प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष ज्यांचे मला सहकार्य लाभले त्या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे तसेच ही ई—पुस्तिका प्रकाशित करून अभ्यास सांग अभ्यासक्रम पर्यंत पोचविण्याची कार्य केल्यामुळे मी हर्षवर्धन पब्लिकेशन चा सुद्धा आभारी आहे

**डॉ. नीलेश र. निंबाळकर**

# अनुक्रमणिका....



| | | |
|---|---|---|
| १) | स्विर्झलंडचा ऐतिहासिक आढावा | ०६ |
| २) | स्विर्झलंडची संविधानिक संरचना | १५ |
| ३) | स्विर्झलंड चे सांघिक कायदे मंडळ | २८ |
| ४) | स्विर्झलंड न्यायमंडळ | ३७ |
| ५) | स्विर्झलंड मधील प्रत्यक्ष लोकशाही | ४२ |



❑❑❑

**01**

# स्विर्झलंडचा ऐतिहासिक आढावा

स्विर्झलंडची राज्य व्यवस्था प्राचीन आहे. स्विर्झलंड मध्ये चाललेल्या राजकीय प्रक्रीयेतुन तिचा विकास झाला आहे. अभ्यासाच्या दृष्टिकोनातून स्विर्झलंड राजकीय व्यवस्थेच्या विकासाचे पाच कालखंड पाडता येतात ते पुढील प्रमाणे:-

**अ) प्राचिन संघ (इ.स.१२१९ ते १७८०):-**

इ.स. १२१९ मध्ये ट्युटानिक जमातीच्या लोकांनी आपआपसात करार करुन उरी, स्वेज आणि अंटरवाल्डेन या तीन कॅन्टान्सनी आपल्या संरक्षणासाठी एक संघ स्थापन करुन १३ व्या शतकात स्विस राज्यसंघाचा पाया घातला. हे संघटन कमकुवत करण्यासाठी लिओपाल्ड या ऑस्ट्रियाच्या सम्राटाने स्विर्झलंड वर आक्रमण केले या युध्दात स्विर्झलंड राज्यसंघाचा विजय झाला, या घटनेनंतर राज्यसंघात १३५३ पर्यंत ५ कॅटॉन्स राज्यसंघात सामिल झाले. १६४८ च्या रोमन सम्राटाशी झालेल्या च्या वेस्टफालीयाच्या तहानुसार स्विस राज्यसंघाला स्वंतत्र व सार्वभौम राज्य म्हणून मान्यता देण्यात आली.

थोडक्यात बाह्य प्रदेशातील शत्रुच्या आक्रमणाचे भय व आपल्या गणराज्य पध्दतीचे संरक्षण करण्याची तिव्र इच्छा या दोन कारणामुळे स्विर्झलंडच्या राज्यसंघाची निर्मिती झाली.या स्विझ राज्यसंघात तेराही कॅटान्सची स्वंतत्र शासन व्यवस्था होती.राज्यसंघाच्या सर्वात महत्वाचा दोष म्हणजे या केंद्रीय कार्यकारी मंडळ व सैन्याच्या अभाव होता.राज्यसंघा बाबत निर्णय घेण्यासाठी डायट नावाची कॅन्टान्सचे प्रतिनिधी असणारी सभा होती.परंतू डायट चे निर्णय सर्व राज्यावर बंधनकारक नव्हते. स्विझ्र्लंडचा राज्यसंघ १७८० पर्यंत आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राखुन होता स्विस कॅन्टान्समध्ये परस्पर इर्षा आणि द्वेष भावनेतून संघर्ष निर्माण होत असते.

**ब) हेल्वेटीक गणराज्य (१७९८ ते १८०३) :-**

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रान्संचे क्रांतीकारक सैन्य १७९४ मध्ये स्विर्झलंडमध्ये

शिरले, फ्रेंच सैन्याने राज्यसंघाचा पराभव करुन तेथे हेल्वेटीक गणराज्याची स्थापना केली.कॅटान्स मधील सामाजिक व राजकीय संस्था नष्ट केल्या त्यामुळे स्विर्व्झलंडचा कारभार फ्रान्सच्या ध्येय धोरणानुसार चालु लागला. या कालखंडात नोकरशाही आणि राष्ट्रीय नागरिकत्व व निर्माण करण्यात आले तसेच स्विर्व्झलंडच्या सर्व कॅटान्सला प्रशासकीय घटकाचा दर्जा देण्यात आला.अशा रितीने हेल्वेटिक गणराजाच्या स्वरुपाने स्विर्व्झलंडमध्ये आधुनिक लोकशाही व्यवस्थेचा पाया घातला गेला. स्विस कॅटान्स समुहाला स्थानिक स्तरावरील शासन कारभाराबाबत राजकीय स्वातंत्र्याची सवय होती. स्विर्व्झलंडचे सैन्य व साधन सपंत्ती फ्रान्सने आपल्या स्वार्थासाठी वापरणे सुरु केले.त्यामुळे स्विस जनतेत अंसतोष निर्माण झाला. त्यांनी गणराज्य विरुध्द विद्रोही चळवळ सुरु केली फ्रान्सने दडपशाहीच्या मार्गाने व सैन्यशक्तीच्या बळाद्वारे नागरीकाची चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला या दरम्यान फ्रान्स ऑस्ट्रिया मध्ये युध्द सुरु झाले फ्रान्सने हे युध्द स्विर्व्झलंड च्या भूमिवर नेले त्यामुळे स्विस जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला.

**क) नेपोलीयानचा काळ (१८०३ ते १८१३) :-**

असंतोष दूर करण्यासाठी १८०३ मध्ये नेपोलीयन ने स्विस समुहांना त्यांच्या प्रातामध्ये प्रारंभी असलेली शासन व्यवस्था पुन्हा निर्माण करण्याची संमती दिली त्या साठी पॅरीस येथे १८०३ मध्ये ॲक्ट ऑफ मेडीऐशन मंजुर करुन घेतला या कायद्यानुसार स्विस मध्ये संघराज्याची स्थापना करण्यात आली १९ पुर्ण कॅटान्स निर्माण करण्यात आले होते. १८१३ मधील नेपोलीयनच्या पराभवनंतर स्विस राज्यसंघाला पुर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळाले.

**ड) संघशासनाचा काळ (१८१४ ते १८४८) :-**

नेपोलीयनच्या पराभवानंतर मित्र राष्ट्रानी १८१४ मध्ये स्वित्झलँडला नविन राज्यघटना निर्माण करण्याची जबाबदारी सोपविली होती. १८१५ मध्ये व्हिएन्ना कॉग्रेसने नवीन स्विस राज्यघटनेस मान्यता दिली आणि स्विर्व्झलंडला कायम तटस्थ राष्ट्राचा दर्जा दिली मित्र राष्ट्रे आणि स्विर्व्झलंडचे संघराज्य यांच्यात पॅरीस येथे करार झाला. राजकीय स्वांतत्र्यानंतर स्विस राज्यसंघात ६ कॅटान्स सामील झाले स्विस राज्यसंघातील कॅटान्स ची संख्या १९ झाली.१८१५ च्या व्हिएन्ना कॉग्रसने ३ कॅटान्स सामील करुन घेण्याची परवानगी राज्यसंघाला दिली. स्विस राज्यसंघ २२ कॅटान्सचा बनला त्या नंतरच्या काळात धार्मिक भेदाच्या आधावर तिन कॅटान्सचे विभाजन करण्यात आले. विभाजीत कॅटान्सला अर्ध कॅटान्स असे संबोधण्यात येऊ लागले.

**इ) १८४८ व १८७४ ची राज्यघटना**

स्विर्झलंडमध्ये १८३० पर्यंतचा काळ शांततेत गेला नंतरच्या काळात प्रोटेस्टंट व कॅथालिक पंथाच्या संघार्षामुळे १८४७ साली गृहयुध्द झाले. कॅथालिक पंथाचे प्राबल्य असणाऱ्या ७ कॅटान्सनी सॅडरबंड नावाचा वेगळा संघ तयार केला व संघराज्याविरुध्द युध्द पुकारले या युध्दात संघराज्याचा विजय झाला. त्यानंतर १८४८ मध्ये स्विस संघराज्याच्या डायटने नविन राज्यघटना निर्माण केली १८४८ च्या संविधानानेच स्विव्झर्लंड संघात्मक शासन व्यवस्थेचा प्रांरभ झाला पुर्ण घटना दुरुस्ती प्रक्रिये द्वारा १८४८ चे संविधान १८७४ मध्ये बदलविण्यात आले. या संविधानानुसार संघीय शासन संस्थेचे अधिकार अधिक प्रमाणात वाढविण्यात आले.प्रत्यक्ष लोकशाहीच्या साधनाला अधिक महत्व देण्यात आले.सैन्यावर नागरिकाची सत्ता प्रस्तापित झाली.आणि सामाजिक क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेप मान्य करण्यात आला.राजकीय सत्तेच्या केंद्रीकरणाला स्विकृती देण्यात आली.तसेच धर्मगुरुच्या अधिकारावर नियत्रण लावण्यात आले.या नंतरच्या कालखंडात राज्यघटनेत काळानुसार अनेक बदल घडून आले.परंतू राज्यघटनेचे मुळ स्वरुप बदलले नाही ते आजही कायम आहे.

**स्विर्झलंडच्या संविधान व शासनव्यवस्थेची ठळक वैशिष्टये :-**

कुठलीही राजकीय व्यवस्था त्या समुहाच्या सांस्कृतीक व्यवस्थेशी निगडीत असते.त्या दृष्टीने त्या राजकीय अवस्थेची वैशिष्ट्ये विकसीत होत असतात. स्विव्झर्लंडच्या राजकीय व्यवस्थेचा सुध्दा आपणास अभ्यास करावा लागतो त्यातुनच आपणास त्या व्यवस्थेची ओळख होते. तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाहीच्या दृष्टीने राज्यशास्त्राच्या अभ्यासकासाठी स्विर्झलंडच्या राज्यव्यवस्थेचा विचार करणे आवश्यक नव्हे तर अनिवार्य आहे.पाश्चिमात्य राष्ट्रातील प्राचिन गणराज्य जे प्रत्यक्ष लोकशाही साधनाचा विकासामुळे प्रत्यक्ष लोकशाहीची प्रयोगशाळा म्हणून ओळखले जाते.विविधतेत एकता, तटस्थता, अनेकात्मक कार्यपालीका, संघराज्य व्यवस्था, संपूर्ण घटना दुरुस्ती ची पध्दती जनतेचे सार्वभौमत्व या सर्व बाबीमुळे स्विस राज्यव्यवस्था वैशिष्टये पुर्ण झाली आहे.अशा घटनेची व शासन व्यवस्थेची ठळक वैशिष्टये पुढील प्रमाणे आहे.

**१) निर्मित व लिखीत राज्यघटना :-**

स्विर्झलंडची राज्यघटना लिखीत आहे.१८४८ साली निर्मित संविधानात १८७४ मध्ये बदल करण्यात आला.१९९९ च्या घटना दुरुस्ती नुसार सध्या स्विस संविधानात १९६ कलमे असुन नागरिकाचे मुलभुत अधिकार कर्तव्य, केंद्र सरकारच्या

महत्वाच्या सत्तेचा उल्लेख त्यात असुन तो तीन विभागात विभागली गेली आहे.त्यानुसार मच्छीमार शिकार इ.गोष्टी त्यात नमुद आहे.काळाच्या ओघात स्विस राज्यघटना अनेक बदल झालेले असले तरी मुळ स्वरुप मात्र आजही कायम आहे.

**२) परिदृढ तसेच अपरिवर्तनीय राज्यघटना (Rigid Constituation)**

घटना दुरुस्ती साठी जनसंमती घ्यावी लागते राज्यघटनेत बदल करण्याचा अंतीम अधिकार स्विर्व्झलंड मधील नागरिकांना आहे. राज्यघटनेचे लिखीत स्वरुप व संघराज्यात्मक व्यवस्थेमुळे ही राज्यघटना परिदृढ ठेवण्यात आली आहे. स्विस सांघीक विधीमंडळाने मंजुर केलेल्या घटना दुरुस्ती विधेयकाला नागरिकानी बहुमताने मंजुरी दिली तरच घटना दुरुस्ती होऊ शकते. स्विस नागरीक सुध्दा राज्यघटनेत दुरुस्ती करण्यासाठी पुढाकार घेऊ शकतात. घटना दुरुस्तीची प्रक्रिया कठीण व गुंतागुतीची आहे. ही प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी दिर्घकालावधी लागतो.यामुळे स्विर्व्झलंडचे संविधान परिदृढ आहे. असे म्हणावे लागेल.

**३) संघराज्य व्यवस्था (Federal System)**

स्विर्व्झलंडमध्ये संघराज्यात्मक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.परंतु राज्यघटनेत संघराज्य (Fedration) ऐवजी राज्यसंघ (Confederation) हा शब्द वापरला आहे, तरी राज्यसंघाची सर्व वैशिष्ट्ये स्विर्व्झलंडच्या राज्यव्यवस्थेत आढळुन येतात. स्विर्व्झलंडच्या संघराज्यात २६ कॅटान्स आहेत. त्यापैकी १९ पुर्ण व ६ कॅटान्स ओह. केंद्रसरकार व कॅटान्स मध्ये सत्ता व अधिकाराचे विभाजन करण्यात आले. केंद्रसरकारचे अधिकार निश्चीत करुन तेच केंद्रीयराज्यघटनेत दिले आहे. केंद्र व कॅटान्स मधील वादविवादावर निर्णय देण्यासाठी सर्वांच्य न्यायालय ही स्थापना करण्यात आले आहे. यामुळे सर्व कॅटान्सला समान राजकीय दर्जा प्राप्त झाला आहे. अशा रितीने स्वित्झलँडच्या संघराज्याची उभारणी पुर्णपणे संघीय तत्वावर करण्यात आली आहे.

**४) गणराज्यात्मक शासन (Republic)**

पाश्चात्य राज्यातील सर्वांत प्राचीन गणराज्य म्हणुन स्विर्व्झलंड ओळखले जाते. स्विर्व्झलंडने राजेशाहीला कधीच आश्रय दिला नाही. स्विस संघराज्याच्या प्रत्येक कॅटान्स मध्ये गणराज्यात्मक शासन निर्माण करण्यात आले आहे. स्विर्व्झलंड मधील सांघीक कार्यकारी मंडळातील सात सदस्याची निवड जनता अप्रत्यक्ष पणे करतो म्हणजेच स्विस सांघींक विधिमंडळाद्वारे फेडरल कॉन्सील सदरयांची निवड होते. त्यातुन दरवर्षी एक सदस्य स्विर्व्झलंडचा अध्यक्ष म्हणुन काम पाहतो. स्वित्स मध्ये कॅटान्सची

राज्यसंघ निर्माण केल्यानंतरही प्रत्येक कॅटान्सने आपले स्वतंत्र अस्तित्व, संविधान व प्रादेशिक स्तरावर पध्दती बाबतचे राजकीय स्वांतत्र्य कायम राखले ह्युबर च्या मते राजतंत्रात्मक दृष्ट्या विचार करणे स्विस जनतेला अपरिचीत आहे.

**५) अनेकात्मक कार्यकारी मंडळ (Plural Executive)**

अनेकात्मक किंवा बहुल कार्यकारी मंडळ हे स्विर्झलंडच्या राज्यव्यवस्थेत फार महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. स्विर्झलंडच्या कार्यकारी मंडळाल फेडरला कौन्सील असे म्हणतात. स्विस कायदेमंडळ सभासद (फेडरला असेंब्ली चे सभासद) फेडरल कॉन्सीलच्या ७ सभासदाची निवड आपल्या मधुनच बहुमताने करतात. कार्यकारी मंडळात निरनिराळ्या पक्षाचे सदस्य असतात.प्रत्येक सभासदाकडे शासनाचा एक विभाग सोपविला असतो. त्या विभागाच्या कारभारबाबत तो सभासद व्यक्तीश: निर्णय घेऊ शकतो. त्यासाठी तो व्यक्तीश: जबाबदार असतो. अनेकात्मक कार्यपालीका सामुदायिकरीत्या कायदेमंडळाला जबाबदार नसते दरवर्षी फेडरल कॉन्सील अनेकात्मक कार्यपालीकेतील एका सदस्याची स्विर्झलंडच्या अध्यक्ष म्हणुन निवड करतो परंतु त्याला कोणतेही विशेष सत्ता व अधिकार दिले नाहीत. इतर सभासदा प्रमाणे अध्यक्ष कडेही शासनाचा एक विभाग सोपविला जातो. स्विर्झलंडमधील कार्यपालीकेत संसदीय पध्दतीतील जबाबदारी व अध्यक्ष पध्दतीतील स्थिरता हे दोन्ही गुण दिसुन येतात तसेच ते पक्षीय नसुन त्यांच्या मध्ये विविध पक्षातील व्यक्तीचा समावेश करण्यात येतो.

**६) अध्यक्षिय व सांसदीय पध्दतीचे संमिश्रण (Mixture of Presidential Parliamentary System)**

स्विर्झलंड राज्यव्यवस्थेत संसदीय व अध्यक्षीय शासन पध्दतीचे संमिश्रण झालेले आहे.सांघिक कार्यपालीकेचे सभासद सांघीक विधीमंडळाकडुन निवडले जातात.ते विधीमंडळाचे ही सदस्य असतात.त्यामुळे विधीमंडळाच्या कामकाजात भाग घेतात.आणि विधीमंडळाला जबाबदार असतात. विधीमंडळाचे सभासद त्यांना प्रश्न उपप्रश्न विचारुन त्यांच्या खात्याच्या कारभारची चौकशी करुन शकतात.परंतु अविश्वासाचा ठराव आणुन कायदेमंडळ कार्यकारी सदस्याला किंवा संपुर्ण कार्यकारी मंडळाला पदावरुन काढु शकत नाही.त्यामुळे अध्यक्षीय शासन पध्दती प्रमाणेच कार्यकारी मंडळ एकदा निवड झाल्यानंतर कार्यकाल संपेपर्यंत आपल्या पदावर राहतो. आणि स्वतंत्रपणे कार्य करु शकतो. अशा रितीने सांसदिय शासनातील जबाबदारी व अध्यक्षीय शासनातील स्थैर्य या दोन्ही गुणाचा मिलाप स्विस राज्यव्यवस्थेत आहे.

**७) निर्वाचित न्याय मंडळ (Elected Judicialy)**

स्विर्झलंडमधील न्यायडळाची रचना वैशिष्ट्यपुर्ण आहे.फेडरल ट्रिब्युनल हे संघ शासनाचे एकमेव न्यायालय आहे.त्याच्या खाली दुसरे कोणतेही न्यायालय नाही.या न्यायालयाला मर्यादीत स्वरुपाचा न्यायिकपुर्णविलोकनाचा अधिकार देण्यात आला आहे. स्विर्झलंडचे सर्वोच्य न्यायालय केंद्रीय कायदे मंडळाने निर्माण केलेल्या कायद्याना घटना बाह्य, किंवा घटनाविरोधी घोषीत करु शकत नाही.फक्त कॅटान्सच्या विधीमंडळाने निर्माण केलेल्या कायद्याना घटना बाह्य घोषीत करण्याचा त्याला अधिकार आहे.या न्यायालयाचे आगळे वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे या न्यायालयाचे न्यायाधीश निर्वाचीत असतात.त्यांना सांघिक विधीमंडळाचे सदस्य ६ वर्षासाठी निवडतात.सांघिक विधीमंडळाचा सदस्य होण्यासाठी आवश्यक असणारी पात्रता असलेल्या व्यक्तीला सर्वोच्य न्यायालयाच्या न्यायाधीश पदासाठी निवडुन येता येते.न्यायाधीशासाठी कायद्याचे ज्ञान किंवा कायद्याची पदवी असणे आवश्यक नाही. न्यायाधिशाची निवडणुक ठरावीक कालमर्यादेत होत असली तरी त्याच व्यक्तीला पुन्हा निवडण्याची प्रथा निवडण्यात येत असल्यामुळे त्यांच्या पदांना स्थिरता प्राप्त झाली आहे.

**८) जनतेचे सार्वभौमत्व (Sovereignty of the People)**

स्विस जनता खऱ्या अर्थाने सार्वभौम आहे. विधी उपक्रम व जनमत दर्शन ही प्रत्यक्ष लोकशाहीची दोन साधने जनतेचे सार्वभौमत्व निर्माण करण्यास कारणीभुत आहे. सांघिक राज्यघटनेत अशंत: किंवा पुर्णत: बदल करण्याचा तसेच केंद्रीय विधीमंडळाने निर्माण केलेला कायदा स्विकारण्याचा किंवा अमान्य करण्याचा अधिकार जनतेला आहे. जनईच्छेच्या विरोधात कोणतेही कार्य शासन करता येत नाही. जननिर्णय (Referendum), विधीउपक्रम (Initiative) परत बोलावणे (Recall) याच्या आधारावर आपला अधिकार प्रस्तापित करते. स्विर्झलंडमधील जनतेच्या प्रत्यक्ष व सक्रीय सहभागातुन खऱ्या अर्थाने जनतेचे सार्वभौमत्व प्रस्तापित झाले आहे.

**९) प्रत्यक्ष लोकशाही (Direct Demecarcy)**

प्रत्यक्ष लोकशाहीचे अस्तीत्व हे स्विर्झलंडच्या शासनव्यवस्थचे सर्वाधिक महत्वपुर्ण वैशिष्ट्ये आहे.प्रतिनिधीक लोकशाहीच्या युगात स्विर्झलंड असा एकमेव देश आहे.की जेथे प्रत्यक्ष लोकशाही आहे, राज्यकारभाराच्या सोयीसाठी प्रतिनिधीत्वाची पध्दती जरुर स्वीकारण्यात आली आहे.पण त्याच बरोबर प्रतिनिधीवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही साधने निर्माण करण्यात आली आहे.लॉर्ड बर्जरच्या मते "स्विर्झलंड आणि

लोकशाही हे पर्यायी शब्द बनले आहेत." स्विस मध्ये विधी उपक्रम, जननिर्णय, नागरिकाची सभा, प्रत्यावहन ही लोकशाहीची साधने विकसीत झाली आहे. विधी उपक्रम जननिर्णय या साधनामुळे स्विस जनतेला विशिष्ठ विधीनियम तयार करावयास निर्वाचित प्रतिनिधीना भाग पाडता येते.तसेच निर्वाचीत प्रतिनिधीनी केलेले विधेयक फेटाळून ही लावता येते. प्रत्यक्ष लोकशाहीने स्विर्व्झलंडला जगात लोकप्रियता आणि महत्वपुर्ण स्थान मिळवुन दिले.

**१०) मुलभुत अधिकार (Fundamental Rights)**

स्विस नागरिकाच्या मुलभुत अधिकारांना मान्यता मिळाली असुन अधिकाराच्या संरक्षणाची व्यवस्था सुध्दा करण्यात आली आहे. स्विर्व्झलंडच्या नागरिकांना राज्यघटनेने प्रदान केलेले मुलभुत अधिकार निरनिराळया कलमात विखुरलेले आहे.तसेच प्रत्येक कॅटान्स द्वारा आपल्या नागरिकांना काही अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.भाषण स्वातंत्र्य, संघनिर्मितीचे स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, तक्रार करण्याचा हक्क, धर्मस्वातंत्र्य, विधीनियमाची समदृष्टी इ.हक्काचा उल्लेख करण्यात आला आहे. स्विस नागरिकाची प्रगल्भता सहानुभुती आणि सामंजस वृत्ती, तडजोडवादी भुमिका कर्तव्य परायणता आणि निकोप लोकशाही व राष्ट्रवादी दृष्टिकोन इत्यादी गुण वैशिष्ट्यामुळे प्रत्येक नागरिकाला आपले मुलभूत अधिकार उपभोगता येईल अशी परिस्थिती स्वीत्झ मध्ये आहे.

**११) मताधिकार (Francise)**

स्विर्व्झलंड मध्ये व्यापक मताधिकारची व्यवस्था इतर लोकशाही राष्ट्रा प्रमाणे करण्यात आली आहे.राज्यघटनेच्या कलम ७४ नुसार जननिर्णय, विधीउपक्रम व सार्वमताच्या वेळी मतदानात सहभागी होण्याचा आणि केंद्रीय कायदे मंडळाचे सभासद निवडुन देण्याचा अधिकार नागरिकांना दिला आहे.१९७१ पासुन सार्वत्रिक प्रौढमताधिकारचे तत्व स्विकारुन सर्व स्त्रि पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला.१९९१ पासुन मतदाराच्या वयाची मर्यादा २० वर्षापासुन १८ वर्षावर आणली म्हणजे वयाची १८ वर्ष पुर्ण केलेला प्रत्येक नागरिक मतदानात भाग घेऊ शकतो.

**१२) बहुपक्ष पध्दती (Multy-Party System)**

बहुपक्ष पध्दती स्विर्व्झलंडच्या राज्यव्यवस्थेत महत्वाचे वैश्‍िष्टये आहे.परंतु इतर लोकशाही राष्ट्राप्रमाणे स्विर्व्झलंड मध्ये राजकीय पक्षाना महत्व नाही. पक्षांना महत्व देण्याऐवजी राष्ट्राला महत्व देण्याची प्रवृत्ती सर्वच राजकीय पक्षांत आढळते.

स्विस नागरिक सुध्दा पक्षाच्या ध्येय धोरण व कार्यक्रमाना महत्व न देता उमेदवारांना महत्व देतात त्यामुळे प्रचाराचा गदारोळ, एकमेकावर दोषारोपन, पक्षसंघर्ष या गोष्टी स्विर्व्झलंड मध्ये दिसुन येत नाही. स्विर्व्झलंड मध्ये चार प्रमुख राजकीय पक्ष आहे. द रॅडिकल डेमोक्रॅटीक पार्टी, द सोशल डेमोक्रॅकीक पार्टी, द ख्रिश्चन डेमोक्रॅटीक पार्टी, द स्वीस पीपल्स पार्टी स्विर्व्झलंडच्या सांघीक कार्यपालीकेत हया चारही पक्षाचे लोक असतात एक प्रकारे संमिश्र सरकार स्विर्व्झलंड मध्ये कार्य करते. अनेक पक्ष असुन सुध्दा शासनाने कार्य सुरळीत चालते त्यामुळे बहुपक्ष पध्दती व संमिश्र सरकार हे स्विर्व्झलंडच्या राज्यघटनेचे वैशिष्टये ठरले आहे.

**१३) अनेक भाषांना मान्यता**

स्विर्व्झलंड हा बहुभाषीक देश आहे. स्विर्व्झलंडराष्ट्राची स्वत:ची अशी वेगळी भाषा नाही. तेथे प्रारंभापासुन सामाजिक व राजकीय व्यवहारात जर्मन, फ्रेंच, इटालियन भाषांचा उपयोग केला जातो.त्यामुळे स्वित्सलॅडच्या संविधानाने राज्यव्यवहारसाठी विविध भाषांना मान्यता दिली आहे.राज्यव्यवहारसाठी एकाच भाषेचा आग्रह न धरणे हा स्विर्व्झलंडच्या जनतेचा व्यावहारीक दृष्टीकोन बहुभाषिक देशासाठी प्रशंसनिय स्वरुपाचा ठरतो.

अशा प्रकारे प्रमुख वैशिष्टये स्विर्व्झलंडच्या राज्य व्यवस्थेत आढळतात.या वैशिष्ट्यांवरुन आपणास स्विस राजकीय व्यवस्थेची ओळख होते.

**स्विर्व्झलंडच्या राज्यघटनेचा विकास व वैशिष्टये**

१) स्विस संघराज्याचा पाया कोणत्या शतकात घातल्या गेला.
(अ) १३वे (ब) १४वे
(क) १५वे (ड) १६वे (अ)

२) स्विस संघराज्याला स्वतंत्र व सार्वभौम राज्य म्हणुन मान्यता कोणत्या तहानुसार प्राप्त झाली?
(अ) फीलाडेल्फीया (ब) वेस्टफालीया
(क) व्हर्सायिच्या (ड) यापैकीनाही (ब)

३) फेंच आक्रमणनंतर स्विझर्लंड मध्ये कोणत्या गणराज्याची स्थापना झाली.
(अ) स्विसगणराज्य (ब)ग्रिकगणराज्य
(क) हेल्वेटिकगणराज्य (ड) यापैकीनाही (क)

४) कोणत्या कॉग्रेसने स्विझर्लंडला कायम तटस्यतेचा दर्जा दिला.
(अ) व्हिरान्नाकाग्रेस (ब)बर्लीनकाग्रेस

(क) पैरिसकाग्रेस (ड) यापैकीनाही (अ)

५) स्विव्झर्लंडला पुर्ण राजकीय स्वातंत्र्य केव्हा प्राप्त झाले.
(अ) १८१५ (ब) १८१४
(क) १८१२ (ड)१८१३ (ड)

६) स्विव्झर्लंडमध्ये घटक राज्याला काय म्हणतात?
(अ) राज्य (ब)कॅन्टास
(क) प्रांत (ड) विभाग (ब)

७) स्विस मध्ये पुर्ण कॅन्टास कीती?
(अ) १६ (ब) १५
(क) १८ (ड) १९ (ड)

८) स्विस मध्ये संपुर्ण संविधानदुरूस्ती नूसार कोणत्या साली संविधान बदल झाला ?
(अ) १८१४ (ब)१८४८
(क) १८७० (ड) १८७४ (ड)

९) स्विस मध्ये शासनव्यवस्थेचा कोणता प्रकार अस्तित्वात आहे.
(अ) लोकशाही (ब) हुकूमशाही
(क) समाजवादी (ड) सर्वकषवादी (अ)

१०) स्विस राज्यघटनेचे स्वरूप कसे आहे ?
(अ) अलीखीत (ब) लिखीत (क) दोन्ही (ड)यापैकी नाही (ब)

११) स्विस राज्य घटनेचे स्वरूप कसे आहे ?
(अ) परिवर्तनीय (ब)परिट्टढ (क) दोन्ही (ड) यापैकीनाही (ब)

❑❑❑

**02**

# स्विर्व्झलंडची संविधानिक संरचना

**(The Constituational Structure of Switzerland)**

स्विर्व्झलंड राज्यव्यवस्थेचा अभ्यास करतांना तेथील संवैधानिक संरचना कशाप्रकारची आहे.त्यामध्ये कोणकोणती घटक येतात याचा आढावा घेणे आवश्यक ठरते.म्हणून प्रस्तुत प्रकरणात स्विर्व्झलंडची संविधानिक संरचना स्पष्ट केली.
संविधानिक संरचनात

१. स्विर्व्झलंड चे कार्यकारी मंडळ

२. स्विर्व्झलंड चे विधीमंडळ

३. स्विर्व्झलंड चे न्यायमंडळ

**स्विर्व्झलंड चे कार्यकारी मंडळ (Pural Execuative)**

स्विर्व्झलंड मधील कार्यकारी मंडळाला फेडरल कौन्सील असे संबोधले जाते. ही जगातील एकमेव अनेकात्मक कार्यपालीका आहे.सात सदस्याची ही कार्यपालीका असुन या मंडळात एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असतातमात्र त्यांना कोणतेही विशेषधिकार नाही.सर्व निर्णय बहुमताचे घेतल जातात. स्विसचे फेडरला कॉन्सील हे संसदीय व अध्यक्षीय शासन पध्दतीपेक्षा वेगळे व स्वतंत्र असे आहे. स्विसचे सांघिक कार्यकारी मंडळ हे विभिन्न लक्षणा बाबत जगात एकमेवद्वितीय आहे

**२. स्विर्व्झलंड विधिमंडळ**

फेडरल असेंब्ली, या नावाने स्विर्व्झलंड या विधीमंडळाला संबोधले जाते. फेडरला असेब्ली हे द्विगृही विधीमंडळ आहे. नॅशनल कॉन्सील आणि कॉन्सील ऑफ स्टेट अशी या दोन सभागृहाची नावे आहेत. दोन्ही सभागृहाचे सत्ताधारी व विरोधी पक्ष असा प्रकार नाही दोन्ही सभागृहामध्ये कामकाज अत्यंत शांतपणे सुरु असणारे जागतीक एकमेव विधीमंडळ आहे.

**३. स्विर्झ्लंड न्यायमंडळ (Judiciary of Swizerland)**

'फेडरल ट्रिब्युनल' असे स्विर्झ्लंडच्या अंतिम न्यायालयला संबोधले जाते या न्यायमंडळातील न्यायाधीश निर्वाचीत असतात. निर्वाचीत असुनही ते निपक्षपणे व स्वतंत्रपणे कार्य करित असतात. स्विर्झ्लंड संविधात्मक संरचनेला तीनही विभाग वैशिष्टये पुर्ण आहे.

स्विर्झ्लंड च्या संघराज्यातील अतिशय लहान आकाराच्या काही घटकराज्यामध्ये (त्यांना कॅटान्स असे संबोधले जाते.)आजही प्रत्यक्ष लोकशाही टिकुन आहे. निर्वाचीत प्रतिनिधी मार्फत शासन व राज्यकारभार चालविण्याज्या स्वित्स नागरिकांना संविधानाने विधीउपक्रम आणि जनमत दर्शन ही प्रत्यक्ष लोकशाहीची दोन साधने मिळवुन दिलेली आहे. म्हणुनच स्विर्झ्लंड ला प्रत्यक्ष लोकशाहीच माहेरघर म्हटले जाते.

**स्विर्झ्लंड कार्यकारी मंडळाची साधारण वैशिष्टये**

**(Unique Featurers Of Fderal Council)**

जगातील सर्व कार्यपालिकेत स्विर्झ्लंड चे कार्यपालिका आपले स्वरुप, रचना अधिकार व कार्य भूमिका यांच्या आधारे भिन्न आहे. स्विर्झ्लंड डची कार्यपालिका बहुलकार्यपालीका असुन तीचे स्वरुप भारत, ब्रिटनच्या कार्यपालीके प्रमाणे नाही स्विव्झ ा राष्ट्राध्यक्षाचे अधिकार सांघिक कार्यपालीकेच्या आधारे अमेरीकेच्या अध्यक्षिय कार्यपालीके प्रमाणे नाही. स्विर्झ्लंड च्या कार्यपालीकेच्या वैशिष्टयाने प्रभावित होऊन ब्राईस म्हणतो. 'स्विर्झ्लंड सर्व संस्था मध्ये सांघीक कार्यपालीकेच्या सर्वात जास्त अभ्यासाची अपेक्षा करतो.'

स्विर्झ्लंडच्या कार्यपालिकेची प्रमुख असाधारण वैशिष्टये पुढील प्रमाणे आहे.

**स्विर्झ्लंडच्या कार्यपालिकेचा प्रमुख असाधारण वैशिष्टये**

**(Unique Features Of Federal Council)**

१. अनेकात्मक किंवा बहुत कार्यकारी मंडळ
२. विधीमंडळापासून स्वतंत्र
३. सांघीक विभागावर नियंत्रण
४. राजकीयपक्ष पध्दतीच्या दोषापासुन मुक्त
५. योग्य अनुभवी व्यक्ती चे संघटन
६. संसदीय आणि अध्यक्षिय पध्दतीचा समन्वय
७. संवैधानिक दृष्टीने कनिष्ट स्थान असुनही महत्व पुर्ण भूमिका

**१ अनेकात्मक किंवा बहुल कार्यकारी मंडळ**

स्विर्झलंड च्या कार्यपालीकेची सत्ता एका व्यक्तीच्या हाती नसुन सात व्यक्तीच्या एका समितीच्या हाती आहे. ज्यात सर्व सदस्याची सत्ता ही सारखी आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष पद आहे परंतु अध्यक्षाला कोणतेही विशेष अधिकार नाही. अध्यक्ष सर्वकार्य (फेडरल कौन्सील) सांघीक कार्यपालीच्या वतीने करतो म्हणुन अनेकात्मक कार्यपालीका हे फेडरला कौन्सीलचे असाधारण वैशिष्टये आहे.

**२. विधीमंडळा पासुन स्वतंत्र**

स्विर्झलंड मधील बहुल कार्यपालीकेतील सर्व सदस्याची निवडणुक सांघिक विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त अधिवेशनात केली जाते. परंतु स्विर्झलंड मधील कायदेमंडळ सांघीक कार्यपालीकेला भंग करुन शकत नाही अशा प्रकारे ही कार्यपालीका विधीमंडळापासुन स्वतंत्र राहुन आपले कार्य करते. स्विस मध्ये सामुहीक जबाबदारीचे तत्व नाही.

**३. सांघीक विभागावर नियंत्रण**

स्विर्झलंडची कार्यपालीका एक वास्तविक कार्यपालीका आहे. बहुत कार्यपालीकेतील प्रत्येक सदस्य हा सांघीक शासनातील कोणत्या तरी विभागाचा अध्यक्ष असतो तसेच सर्व सदस्य आपआपल्या विभागाच्या कार्याबाबत जबाबदार असतात.

**४. राजकीय पक्ष पध्दतीच्या दोषा पासुन अलिप्त**

या कार्यपालिकेतील सात ही सदस्य एकाच राजकीय पक्षाचे नसतात. भिन्न राजकीय पक्षाचे सदस्य असतात.एकदा निवड झाल्यानंतर त्याच्यावर राजकीय पक्षाचा दबाव नसतो.लार्ड ब्राईस च्या मते "स्विस संघीय कार्यपालीका राजकीय पक्षाच्या बाहेर आहे.पक्षाचे कार्य करण्यासाठी त्यांना निवडून पाठविले जात नाही तसेच राजकीय पक्षाच्या ध्येय धोरणाचे निर्धारण ही करित नाही. तरीही ती राजकीय पक्षाच्या प्रभावापासुन पुर्ण मुक्त नाही." स्विर्झलंड फेडरला कॉन्सील राजकीय पक्ष पध्दतीच्या दोषापासुन बऱ्याच प्रमाणात अलिप्त आहे. म्हणुन फेडरला कॉन्सीलचे स्वरुप अपक्षिय आहे. असे राजकीय अभ्यासकाना वाटते.

**५. योग्य अनुभवी व्यक्ती चे संघटन**

स्विर्झलंड मधील सांघीक कार्यपालीकेचे सदस्यांना सांघीक विधीमंडळाच्या पदावरुन हटविता येत नाही.तसेच त्याच सदस्यांना पुन्हा निवडुन दिले जाते.त्यामुळे आपल्या कार्यात आणि विभागाबाबत विशेषज्ञ होतात. सदस्यांना दिर्घकाळ शासनाच्या

कार्याचे संचालनाची संधी मिळत असल्यामुळे स्विस कार्यपालिका योग्य व अनुभवी व्यक्तीचे संघटन आहे असे म्हणने योग्य आहे. स्थैर्य, जबाबदारी कार्यक्षमता व राजकीय प्रगल्भता या गुणानी युक्त असे हे कार्यकारी मंडळ आहे.

**६. संसदीय आणि अध्यक्षीय पध्दतीचा समन्वय**

स्विर्झलंडच्या कार्यपालिकेत संसदीय आणि अध्यक्षीय पध्दतीची तत्वे आढळुन येतात ती खालील प्रमाणे

संसदीय शासनाची तत्वे

**स्विर्झलंडच्या सांघीक कार्यपालकेत (Federal Counsil)**

पुढील संसदीय शासनाची तत्वे आढळतात.या तत्वाच्या आधारे कार्य करीत असल्यान ही कार्यपालिका सांस्तविय स्वरुपाची आहे असे म्हणता येते.

१. कॉन्सीलची सातही सदस्य फेडरल असेंब्ली मधुन घेण्यात येतात.

२. ते असेब्लीच्या दोन्ही सभागृहात उपस्थित राहुन कामकाजात भाग घेतात.

३. बहुतांश विधेयक फेडरल कॉन्सील कडुनच मांडली जातात.

४. असेब्लीचे सभासद कॉन्सीलच्या कार्याची चौकशी करु शकतात. सदस्याची विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्याची जबाबदारी कॉन्सीलच्या सभासदावर असते.

५. फेडरल असेंब्लीच्या सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याची जबाबदारी कॉन्सीलच्या सभासदावर असते.

६. फेडरल कौन्सीलच्या सभासदांना फेडरल असेंब्लीच्या कायद्याला अनुसरुनच कार्य करावे लागते. दोहांत वाद निर्माण झाल्यास फेडरल असेंब्ली अंतीम असते. म्हणजेच फेडरला कॉन्सीलवर कायदेमंडळाचे पुर्ण नियंत्रण असते.

अध्यक्षीय शासनाची तत्वे येथील कार्यपालीका अध्यक्षीय पध्दतीप्रमाणे आढळते कारण ही कार्यपालीका पुढील अध्यक्षीय तत्वानुसार कार्य करते.

१. सांघीक कार्यपालीकेची सभासद निवडुन आल्यानंतर कायदेमंडळाचे सभासद राहु शकत नाही.

२. अविश्वासाचा ठराव आणुन असेब्ली फेडरला कॉन्सीलला किंवा त्यातील एखाद्या मंत्र्याला पदावरुन काढु शकत नाही.

३. त्याचा कार्यकाल निर्वाचीत असतो आणि कार्यकाळ संपेपर्यंत ते आपल्या पदावर राहतात. संसदीय आणि अध्यक्षिय पध्दतीच्या समन्वया मुळे स्विर्झलंडची

फेडरला कॉन्सील वैशिष्ट्य पुर्ण ठरली आहे. उससंसदीय शासनातील जबाबदारी व अध्यक्षीय शासनातील स्थैर्य हे दोन्ही गुण कार्यकारी मंडळात एकत्र झालेले आहे. मन्रोच्या मते "स्विर्झलंडच्या फेडरल कॉन्सील संसदीय आणि अध्यक्षीय कार्यकारी मंडळाच्या गुणानी युक्त व दोषापासुन मुक्त आहे. बहुल कार्यकारी मंडळ असुनही एकल कार्यकारी मंडळाचे गुण त्यात आढळुन येते."

**७. संवैधानिक दृष्टीने कनिष्ठ स्थान असुनही महत्व पुर्ण भुमिका -**

संवैधानिक दृष्टीने फेडरल असेब्ली ही स्विर्झलंडची सर्वोच्च संस्था होय. सांघीक कार्यपालीकेतील सदस्यांची निवड ही सांघीक विधीमंडळाद्वारे होते. सांघीक विधीमंडळातील बहुमताचा आदर राखण्याचे कार्य फेडरला कॉन्सीलला करावे लागते तथापी राजकीय व्यवहार मध्ये सांघीक विधीमंडळापेक्षा सांघीक कार्यपालीकेची भुमिका अधिक महत्वपुर्ण असल्याचे राजकीय अभ्यासकांना आढळुन येते. कारण फेडरल कॉन्सील फेडरला असेब्लीचे नेतृत्व, स्वित्स जनतेचे नेतृत्व करण्याचे कार्य करते, स्विस संघराज्याचे संरक्षण व आर्थिक विकासाची जबाबदारी पार पाडण्यात फेडरल कॉन्सीलचा सिहांचा वाटा आहे.

अशा यशप्रकारे वरील वैशिष्टयाच्या आधारे स्विर्झलंड च्या सांघीक कार्यपालीका एक उत्कृष्ठ संस्था आहे.

**४.२.४ स्विर्झलंडचे कार्यकारी मंडळ (The Executive) स्विर्झलंड मध्ये कार्यपालिका एक वैशिष्ट्यपुर्ण संस्था असुन स्विस राज्यव्यवस्थेत जिला महत्वपुर्ण स्थान आहे.**

स्विर्झलंड या संविधानाच्या ९५ व्या कलमानुसार 'स्विर्झलंडया राज्यघटनेत संपुर्ण कार्यकारी सत्ता कोणत्याही एका व्यक्ती जवळ नसुन सात लोकांच्या एका मंडळाकडे आहे. हे सातही सदस्य आपल्या विभागाचा कार्यभार सांभाळतात आणि त्यासाठी व्यक्तीश: जबाबदार असतात. या कार्यकारी मंडळाला सांघीक कार्यकारी मंडळ, अनेकात्मक किंवा बहुल कार्यकारी मंडळ म्हणतात.'सांघिक कार्यकारी मंडळाची रचना पुढीलप्रमाणे आहे.

**सांघिक कार्यकारी मंडळाची रचना (Organization of Federal Council)**

स्विर्झलंड च्या घटनेच्या ९५ कलमानुसार सांघिक कार्यकारी मंडळात सात सभासद असतात.त्याची निवड सांघीक विधीमंडळ (Federal Assembly) कडुन केली जाते.९६ कलमानुसार सांघिक विधीमंडळाच्या राष्ट्रीय परिषद व राज्यसभा या

दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीत बहुमताने त्यांची निवड होते. सांघीक व्यवस्थे नुसार सांघीक कार्यकारी मंडळात एका कॅटान्स मधुन एकापेक्षा जास्त सदस्य असायला नको सांघीक विधीमंडळाच्या सभासदामधुनच फेडरला कॉन्सीलचे सभासद निवडण्यात यावे असा संकेत आहे. परंतु एकदा निवड झाल्यानंतर त्याला सांघीक विधीमंडळाच्या सभासदत्वाचा त्याग करावा लागतो. म्हणजे ते खऱ्या अर्थाने नि:पक्ष स्वरुपात पक्षीय दबावापासुन दुर असतात.

सभासदत्वा बाबत घटनात्मक बंधने : येथे कार्यपालीकेची निवड करतांना सांघिक विधीमंडळाला काही बंधने (संकेत) पाळावी लागतात.

१. बर्न झुरीच व वॉड या कॅटान्स मधुन प्रत्येक एक सभासद कार्यकारी मंडळात असावा.

२. एका कॅटान्स मधुन एकापेक्षा जास्त सभासद घेत येत नाही.

३. सात सदस्यात ४ जर्मन भाषीक २ फ्रेन्च भाषीक आणि १ इटालियन भाषीक प्रांतातुन सभासद घेण्यात यावा असा संकेत आहे.

४. निपक्षतेसाठी उदारवादी, समाजवादी, कृषक, कॅथलीक पक्षातील व्यक्तींना सदस्य म्हणुन कार्यकारी परीषदेत घ्यावे.

५. कार्यकाल संपण्यापुर्वी एखादे पद रिकामे झाले असेल तर तो सभासद ज्या पक्षाचा किंवा ज्या गटाचा असेल त्याप्रमाणे सभासदाची निवड केली जाते.

अशा तऱ्हेने विभिन्न संकेत लक्षात घेतल्यानंतर असे आढळते की यामुळे स्विस कार्यपालीकेचे स्वरुप सर्व समावेशक, नि:पक्ष, लोकशाही पुरक बनले आहे.

सभासदासाठी पात्रता कार्यपालीकेचा सभासद बनण्यासाठी स्वतंत्र कोणतीही पात्रता नसुन प्रामुख्याने राष्ट्रीय परिषदेचा सभासद बनण्यास पात्र असावा त्यानुसार

१. तो कोणत्याही स्विस कॅन्टॉन्सचा नागरिक असावा.

२. त्याचे वयाच्या २० वर्ष पुर्ण केलेली असावी.

३. नॅशनल कॉन्सील (राष्ट्रीय सभेचा) सभासद होण्याची पात्रता त्याची अंगी असावी.

सभादावर बंधने कार्यपालीकेचा सदस्य म्हणुन निवड झाल्यानंतर संभासदांना पुढील बंधने पाळावी लागतात.

१. फेडरला कॉन्सील (साघीक कार्यपालीका ) केंद्रीय किंवा कॅन्टान्सचा कायदे मंडळाचा सभासद राहु शकत नाही.

२. त्याला केंद्रीय किंवा कॅटान्स सरकार मध्ये कोणतेही राजकीय किंवा आर्थिक फायद्याचे पद प्राप्त करता येत नाही. तसेच इतर कोणतेही उद्योगधंदा किंवा नोकरी करता येत नाही.

३. धर्मगुरुना फेडरल कॉन्सिलचे सभासद होता येत नाही.

४. सर्व सभासदाने नि:पक्ष कार्य करावे.

५. आपल्या कार्यबाबत प्रत्येकाची जबाबदारी वैयक्तीक स्वरुपाची असते.

**कार्यकाल**

सांघिक कार्यपालीकेचा कार्यकाल ४ वर्षाचा आहे. फेडरल असेब्ली अविश्वासाचा ठराव मंजुर करुन सभासदाला पदावरुन काढु शकत नाही.कार्यकाल संपण्यापुर्वी फेडरल असेब्ली बरखास्त केल्या गेली तर व फेडरल कॉन्सीलचा कार्यकाल संपतो.सभासदाची पुन्हा निवड केली जाते.त्यामुळे इच्छा असे पर्यंत सदस्य आपल्या पदावर राहु शकतात त्यामुळे अनेक वर्षे कार्य केलेले मंत्री आढळतात.

**वेतन**

सांघिक कार्यकारी मंडळाच्या सदस्याला १,१०००० फ्रँक वार्षिक वेतन आणि सोई दिल्या जाततात. १० वर्ष सदस्य म्हणुन काम केलेल्या आणि वयाची ५५ वर्ष पुर्ण झालेल्या सदस्याला निवृत्ती वेतन दिले जाते.

**प्रशासनाचे विभाग**

स्विस मध्ये राज्यकारभारासाठी प्रशाननाने विभाग घटनेनेच ठरवून दिलेले आहेत. सांघिक कार्यपालीकेचे सात विभाग पुढील प्रमाणे आहे.

१. राजकीय विभाग (Political) किंवा परराष्ट्र खाते

२. अंतर्गत (Interior) किंवा गृह खाते

३. न्याय व पोलीस (Justic & Police)

४. सैन्य (Military)किंवा संरक्षण

५. वित्त आणि जकात (Finace and costomes)

६. सार्वजनिक अर्थव्यवस्था

७. पोस्ट व रेल्वे (Post & Railways)

वरील सातपैकी एक विभाग सांघीक कार्यपालीकेच्या प्रत्येक सदस्याकडे सोपविला जातो.

कॉन्सीलच्या सभासदाना प्रशासकीय कामाचे ज्ञान व अनुभव मिळावा यासाठी

एक खाते प्रमुखाला दुसऱ्या खात्याच्या उपाध्यक्ष बनविले जाते. कार्यपध्दती ही कार्यपालिका दैनंदिन कार्य करणारी, प्रशासन चालविणारी संस्था असल्याने सांघिक कार्यकारी मंडळाच्या सात सदस्याची आठवडयातुन दोन वेळा नियमीत बैठक होते.कॉन्सीलचा अध्यक्ष बैठकीच्या अध्यक्ष स्थानी असतो.सातपैकी चार सभादाची उपस्थिती बैठकी साठी आवश्यक आहे सर्व निर्णय बहुमताने घेतले जातात. समान मते पडल्यास अध्यक्ष निर्णायक मत देतो.कोणत्याही प्रश्नावरील निर्णयासाठी किमान ३ सभासदाची अनुकुल मत असणे आवश्यक आहे.एकदा निर्णय झाल्यानंतर तो फेडरला कॉन्सीलने घेतलेला निर्णय होतो. सांघिक कार्यकारी मंडळ सामुहीक जबाबदारीच्या तत्वानुसार कार्य करीत नाही.फेडरल कॉन्सीलने घेतलेल्या निर्णयावर जाहीर टिका झाली तरीही सदस्य आपल्या पदाच्या राजीनामा देत नाही अनेकदा टिकेनंतर धोरणात बदल केला जातो. फेडरल कॉन्सीलने घेतलेला निर्णय जाहीर झाल्यानंतरही त्या निर्णयाबाबत स्वत:चे विरोधी मत सांघिक विधी मंडळच्या सदस्याला व्यक्त करता येते. अशाप्रकारे सांघिक कार्यपालीकेची कार्यपध्दती वैशिष्ट्यपुर्ण आहे.

**सांघिक कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष पदाधिकारी (अध्यक्ष व उपाध्यक्ष)**

सांघिक कार्यपालीकेतील सात सदस्यापैकी एकाच अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणुन निवड केली जाते अध्यक्ष व उपाध्यक्षाचा कार्यकाल एक वर्षाचा असतो.साधारणपणे सांघिक कार्यकारी मंडळाचे सभासदाची जेष्ठतेच्या क्रमानुसार अध्यक्ष म्हणुन निवड केली जातात.यावर्षी उपाध्यक्ष पदासाठी निवड झालेल्या व्यक्तीची पुढील अध्यक्षपदासाठी निवड केली जाते असा संकेत रुढ झाला आहे.सांघीक विधीमंडळाचा अध्यक्ष स्विव्झ र्लिंड च्या राष्ट्राध्यक्ष असतो.परंतु राष्ट्रध्यक्ष म्हणुन त्याला कोणतेही विशेषाधिकार नसतात.तो स्वित्स संघराज्याचा नामधारी प्रमुख असतो. त्याला स्विर्व्झलंड चा प्रथम नागरिक म्हणुन आदर सत्काराची औपचारीक कार्य करावी लागते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात संघराज्याचे प्रतिनिधीत्व तोच करतो. परंतु परराष्ट्राची वाटाघाटी किंवा तह करण्याचा अधिकार त्याला नाही.राष्ट्रीय आणि सार्वजनिक उत्सव प्रसंगी राष्ट्रध्याक्ष म्हणुन त्याची उपस्थिती महत्वाची मानली जाते.राज्यप्रमुख म्हणुन त्याला राज्यकारभारवर देखरेख ठेवण्याचा अधिकार आहे.लॉवेल च्या मते, "स्विस राष्ट्राध्यक्ष सर्व साधारणपने राष्ट्राच्या कार्यपालीकेत समितीचा अध्यक्ष असतो.या आधारे तो आपले सहकारी काय करत आहे. हे जाणुन घेतो. आणि राज्याचा नाममात्र अध्यक्ष पदाचे कर्तव्य पुर्ण करतो." अध्यक्ष सांघिक कार्यकारी मंडळाचा (फेडरल कॉन्सीलचा) प्रमुख आहे व तो सांघिक

कार्यकारी मंडळाचा नेता नसतो.कॉन्सीलच्या बैठकीचे अध्यक्षस्थान तोच स्विकारतो.परंतु मतदान भाग घेत नाही.समान मते पडल्यास निर्णायत मत देण्याचा अधिकारी आहे.इतर सभासद प्रमाणे अध्यक्षाकडे शासनाचा एक विभाग सोपविला जातो व त्या विकासाची संपुर्ण जबाबदारी त्यावर असते.प्रशासकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करने, विधेयकाला संमती देणे, परराष्ट्राची तह करार करणे हे अधिकार स्विर्झलंड च्या अध्यक्षाला नुसन सांघीक विधीमंडळाला आहे.अध्यक्ष केवळ नाममात्र असतो.त्याचे पद इतर सभासदासारखेच असते.फक्त त्याचे नाव प्रथम क्रमांकावर लिहले जाते.

सांघीक कार्यकारी मंडळाची कार्य व अधिकार (Function and Powers of Federal Council) - स्विसची कार्यपालिका हि देशातील सर्वाेच्य संस्था असुन शासन व प्रशासन चालविण्याचा तिला अधिकार आहे. त्या दृष्टीने पुढील विभिन्न अधिकार या मंडळाला प्राप्त झालेले असुन त्याअंतर्गत विभिन्न कार्ये पार पाडली जातात.

**अ. कार्यकारी व कार्ये अधिकार**

१. स्विस संघराज्याची सर्वोच्च कार्यकारी सत्ता सांघिक कार्यपालिकेकडे असुन कायद्याच्या अनुसार संघराज्याचे प्रशासन संघराज्याचे प्रशासनाचे नियत्रण करणे. प्रशासनाबाबत सर्वोच्च सामान्य धोरण ठरविणे.

२. संघीय कार्यपालीका असल्यामुळे ती विधेयक तयार करते व त्याला सांघिक विधीमंडळात मान्य करुन घेणे, तसेच अध्यादेश काढणे इत्यादी कार्य करणे.

३. परराष्ट्र संबंध विषयक धोरण ठरविणे

४. सैन्याची व्यवस्था पहाने व नियत्रंण करणे.

५. सांघिक विधीमंडळाद्वारा ज्या अधिकाऱ्याच्या नियुक्ती ची तरतुद घटनेत नाही अध्या संघीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

६. प्रत्येक वर्षी अंतर्गत व परराष्ट्र संबंधी विषयाचे वार्षिक अहवाल सांघीक विधीमंडळात प्रस्तुत करणे.

७. कॅटान्स मधील शासनास घटनेला अनुसरुन कार्य करण्यास भाग पाडणे, कॅटान्स सोबत प्रशासकीय संबंध ठेवणे.

८. कार्यपालीकेच्या सर्व योजनांना कार्यान्वीत करणे सांघिक कार्यपालीकेचे कार्य आहे.

९. मान्य अंदाजपत्रकानुसार आय - व्यायाच्या सर्व साधनावर संघीय परिषदेचे

नियंत्रण राहते.

१०. कॅटान्स द्वारा करण्यात आलेल्या सर्व संधीची तपासणी करणे.

११. देशाची बाह्य आक्रमण पासुन संरक्षणाची व्यवस्था करणे, संकटकाळात परिस्थीतीत सेनेचा इच्छे नुसार उपयोग करणे.

**ब) कायदे विषयक अधिकार व कार्य:-** यालाच विधिविषयक अधिकार म्हटल्या जाते. या कार्यपालिकेचे सदस्य या अंतर्गत पुढील कार्ये पार पाडतात.

१. कायदेमंडळाच्या कामकाजात भाग घेणे.

२. कलम १०२ नुसार कायदे मंडळाला पुढे विधेयक सादर करणे.

३. कोणत्याही विषयावर जनमत घेण्याचा प्रस्ताव करुन सांघीक विधीमंडळाद्वारे मांडण्याचे कार्य करणे.

४. कॅटान्स द्वारे पारीत सर्व कायद्याची तपासणी सांघीक कार्यपालीका करते.

५. कायदे निर्मीतीच्या क्षेत्रात फेडरल कॉन्सील तज्ञ, सल्लागार, म्हणुन कार्य करते.

**क.) आर्थिक अधिकार व कार्य :-** देशाची सर्वोच्च संस्था म्हणुन या कार्यपालिकेला आर्थिक क्षेत्रात सुध्दा महत्वपुर्ण कार्ये पार पाडावी लागतात.

१. सांघिक शासनाच बजेट तयार करणे आणि त्याला सांघिक विधीमंडळाद्वारे स्विकृतीसाठी पाठविणे.

२. सांघिक कार्यपालीका राजस्व तसेच अन्य कर गोळा करणे.

३. आय-व्यय व्यवहारावर नियंत्रण ठेवणे.

४. वित्तीय व्यवस्थेचेची संपुर्ण व्यवस्था करणे शासनाच्या निरनिराळ्या विभागावर आणि धार्मीक योजनेवर पैसा खर्च करणे. इ. कार्य.

५. आर्थिक बाबतीत सांघीक कार्यपालीकेच्या सांघीक विधीमंडळाच्या संमतीने सर्व कार्य करावी.

**ड) न्यायविषयक अधिकार व कार्य :-** स्विसमध्ये स्वतंत्र न्यायव्यवस्था असली तरी या कार्यपालिकेला काही न्यायविषयक अधिकार प्राप्त झालेले आहेत त्यानुसार.

१. कॅटान्स द्वारा आपआपसात केले गेलेले पारस्पारीक करार तह किंवा कॅटान्स व शेजारी देशा सोबत केलेल्या कराराची संविधानिकतेची तपासणी करणे.

२. वरील कॅटान्सची केलेले करार घटनात्मक दृष्ट्या योग्य नसेल तर त्याला रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला आहे.

३. संघ सरकारच्या अधिकाऱ्या विरुध्द खटले, प्राथमिक शाळेत होणारे धार्मीक भेद भाव, निवडणुक व्यापार, जकात, व अन्य वर इत्यादी प्रकारणात फेडरला कॉन्सीक कडे खटले दाखल करता येते. किंवा अपिल करता येते. परंतु न्यायीक दंड समाप्त किंवा कमी करण्याचा अधिकार नाही.

४. अन्य देशातील कार्यकारी प्रमुखा प्रमाने स्वित्स कार्यकारी प्रमुखास द्या दाखविण्याचा अधिकार नाही.

५. सांघिक प्रशासन विरुध्द केल्या जाणारे अपिल ऐकण्याचा अधिकार सांघीक कार्यपालीकेला आहे.

अशा तऱ्हेने न्यायालयीन क्षेत्रात या मंडळाला फेडरल काहीन्यायविषयक अधिकार असले तरीकॉन्सीलच्या निर्णय अंतिम नसतो.कॉन्सीलच्या निर्णयाविरुध्द फेडरला ट्रिब्युनल आणि फेडरल असेंब्ली कडे अपील दाखल करता येते.

**इ.) लष्करविषयक अधिकार**

बाह्य आक्रमणापासुन सुरक्षा व अंतर्गत शांततेच्या व आणिबाणीच्या काळात आवश्यकते नुसार सैन्य उभरण्यात किंवा अशांत प्रदेशात सैन्य पाठविण्याचे सैन्याचे नियंत्रण व संचालनाचा अधिकार (२००० सैन्याच्या आंत) स्विझ्ञ कार्यकारी मंडळाला आहे. स्विर्झलंड तटस्थ राष्ट्र आहे.तटस्थेचे संरक्षण करण्याचे कार्य स्विस कार्यपालिका करते.संकटकालीन परिस्थीती सांघीक विधीमंडळाने सांघीक कार्यपालीकेला व्यापक अधिकार दिले आहे.

वरील विभिन्न अधिकार व कार्यावरुन असे स्पष्ट होते की, स्विर्झलंड मध्ये सांघीक परिषदेची सत्ता ही व्यापक व विस्तृत आहे.ती अन्य देशातील कार्यपालीकेच्या तुलनेत पर्याप्त शक्तीशाली आहे. सत्ते व्यतिरिक्त प्रतिष्ठा हे ही सांघीक कार्यपालीकेचे सत्तेचे मुख्य साधन आहे. ही प्रतिष्ठा सांघिक कार्यपालीकेला आणखी शक्तीशाली बनविते.परंतु या संदर्भात एक गोष्ट महत्वाची आहे.ती म्हणजे सांघिक कार्यपालीकेचा मुख्य उद्देश जनकल्याण आहे. म्हणुन व्यवहारीक स्वरुपात सांघिक कार्यपालीका ही सांघिक विधीमंडळाच्या इच्छेच्या विरोधात जात नाही लॉर्ड बाईसच्या मते, "स्विर्झ सांघीक कार्यपालीका ही पथदर्शक आहे तसेच साधन ही आहे बरेचदा ती सल्लाही देते आणि मसूदा ही तयार करते. कायदेशीररीत्या सांघीक विधीमंडळाच्या आधीन असुन व्यवहारात ती त्याचा उपयोग सांघिक विधिमंडळाच्या विरुध्द करीत नाही. सर्व सत्ता वापरते जसे इंग्लडचे मंत्रिमंडळ वापरते त्या प्रमाणे यावरुन स्पष्ट होते की, स्विर्झलंड

च्या कार्यपालीकेची सत्ता विस्तृत असूनही ती त्याचा उपयोग सांघिक विधीमंडळा विरुध्द करण्यासाठी त्याचे उल्लंघन करुन त्या सत्तेचा प्रयोग करत नाही."

**स्विर्झलंडची कार्यपालिका (मंत्रीमंडळ)**

१) स्विर्झलंड च्या मंत्रिमंडळाला काय म्हणतात ?
अ) फेडरलकौन्सील ब) फेडरल असेब्ली
क) फेडरल ट्रिबुनल ड) यापैकी नाही

२) फेडरलकौन्सील ला कोणत्या नावाने संबोधले जाते ?
अ) अनेकात्मक मंडळ ब) बहुलकार्य पालिका
क) मंत्रिमंडळ ड) वरिल सर्व

३) फेडरलकौन्सील सभासदांची निवड कोणकरते ?
अ) जनता ब) सांगिकविधीमंडळ
क) सांघिक न्यायालय ड) राज्य सभा

४) स्विर्झलंड च्याकार्यकारी मंडळात कितीसदस्य असतात.?
अ) ०५ ब) ०६ क) ०७ ड) ०९

५) कार्यकारी मंडळाच्या सभासद बनन्यासाठी वयाची किती वर्षे पुर्ण केलेली असावित?
अ) २० वर्षे ब) २१ वर्षे क) २५ वर्षे ड) ३० वर्षे

६) स्विर्झलंड च्या बहुलकर्यपालीकेच्या कार्यकाल किती वर्षे असतो ?
अ) २ वर्षेब) ४ वर्षेक) ५ वर्षेड) ६ वर्षे

७) सांघिककार्यपालकेमध्ये प्रशासनाचे किती विभाग आहे. ?
अ) ०५ ब) ०७ क) ०९ ड) १२

८) सांघिक कार्यपालकेच्या पदाधिकाऱ्यांची निवड कोणकरते ?
अ) सांघिक विधीमंडळ ब) सांघिक कार्यपालीका
क) सांघिक न्यायालय ड) यापैकी नाही.

९) स्विर्झलंड च्या मंत्रिमंडळ पदाधिकाऱ्यांना कार्यकाळ किती ?
अ) १ वर्षेब) २ वर्षेक) ३ वर्षेड) ४ वर्षे

१०) स्विस. मंत्रिमंडळसदस्या संबंधी कोणता महत्वपुर्ण संकेत आहे.
अ) मंत्रिमंडळसदस्याला पुन्हा मंत्री बनता येणार नाही.
ब) मंत्रिमंडळामध्ये एकाच पक्षाचेसदस्य असावे.

क) मंत्र्याची इच्छा असल्यास पुन्हा निवडुन देणे.
ड) यापैकी नाही.

११) स्विस. मंत्रिमंडळा बाबत कोणती प्रथा आढळते ?
अ) विभिन्न भाषा बोलणाऱ्यांना प्रभुत्व
ब) विभिन्न राजकीय पक्षांना प्रतिनिधित्व
क) सदस्यांची इच्छा असे पर्यंत निवड ड) वरिल सर्व

१२) मंत्रिमंडळसदस्याला किती वर्षे कार्यकेल्यास निवृत्ती वेतन प्राप्त होते ?
अ) ५ वर्षे ब) १० वर्षे क) १५ वर्षे ड) यापैकी नाही.

१३) कार्यकारी मंडळाचा अध्यक्षकोण असतो ?
अ) स्विर्त्झलंडचा अध्यक्ष ब) राष्ट्रीय परिषदेचा अध्यक्ष
क) राज्यसभा अध्यक्ष ड) यापैकी नाही

१४) स्विस कार्यपालीकेची प्रमुख वैशिष्टेकोणती ?
अ) विधिमंडळापासुन स्वतंत्र ब) पक्षपध्दतीच्या दोषांनपासुन अलिप्त
क) सांसदिय आणि अध्यक्षीय पध्दती ड) वरील सर्व

१५) स्विस राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार कार्यकारी सत्ता मंत्रिमंडळाकडे सोपविण्यात आली आहे ?
अ) कलम ९० ब) कलम ९३ क) कलम ९५ ड) कलम ९७

१६) मंत्रिमंडळामध्येकोणत्या भाषिक सदस्यांना प्रतिनिधित्व दिलेले आहे ?
अ) जर्मन ब) फ्रेंच क) इटालीयन ड) वरील सर्व

१७) स्विस कार्यपालीका सांसदिय आहे कारण
अ) कार्यपालीकासदस्य विधिमंडळकार्यात भाग घेतात.
ब) सभागृहात विधेयके मांडतात.
क) सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देतात. ड) वरील सर्व

१८) स्विस कार्यपालीका अध्यक्षीय आहेकारण
अ) कार्यपालीकेचेसदस्य विधिमंडळाचे सभासद नसतात.
ब) सांघिक विधिमंडळकार्यपालीकेला पदमुक्त करु शकत नाही.
क) कार्यपालीकेचाकार्यकाळसंपेपर्यंतसदस्य आपल्या पदावर राहतात.
ड) वरील सर्व

❑❑❑

**03**

# स्विर्झलंड चे सांघिक कायदे मंडळ

## (Fedral Assemble)

स्विस मध्ये घटनेनुसार कायदा तयार करण्यासाठी एकास्वतंत्र कायदेमंडळाची विधीमंडळाची निर्मिती करण्यात आलेली असुन त्यास फेडरल असेंब्ली सांघिक विधिमंडळ असे संबोधल्या जाते. येथील विधिमंडळ द्विगृही आहे म्हणजेच सांघीक विधिमंडळाची दोन सभागृहे आहेत.(१) राष्ट्रीय परिषद (National Council) (२) राज्य परिषद (Council of States). स्विर्झलंड मध्ये संघात्मक शासन व्यवस्था आहे.घटनेनुसार साघीक विधिमंडळ ही सर्वोच्य संस्था आहे.सांघीक विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांची रचना व सांघीक विधीमंडळाची अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे आहे.

**सांघिक विधीमंडळाची रचना** :- हे विधिमंडळ द्विगृही असल्याने या अंतर्गत दोन्ही सभागृहाची रचना

१. **राष्ट्रीय परीषद (National Council)**

राष्ट्रीय सभा (National Council) हे फेडरल असेंब्लीचे प्रथम व कनिष्ठ सभागृह आहे. स्विर्झलंड मधील संपुर्ण जनतेचे प्रतिनिधीत्व करते.रचना राष्ट्रीय सभेत जास्तीत जास्त २०० सभासद असतात २४ हजार लोकांना एक प्रतिनिधी या प्रमाणे त्याची निवड केली जाते.संपुर्ण राज्यातून प्रतिनिधी निवडले जाते ज्या कॅटान्सची लोकसंख्या २४ हजारापेक्षा कमी आहे अशा कॅटान्समधून एक प्रतिनिधी निवडला जातो.संपुर्ण राष्ट्रातून प्रतिनिधी निवडले जातात.१९६३ च्या ठरावानूसार सभागृहाची सभासद संख्या २०० पेक्षा अधिक असू नये.

**निवडणूक**

१८ वर्ष पूर्ण केलेल्या प्रत्येक स्विस स्त्री पुरुषास राष्ट्रीय सभेच्या सदस्याला मतदान करण्याचा अधिकार आहे. राष्ट्रीय सभेच्या सदस्यांची निवड स्विर्झलंड च्या

नागरिकाकडून प्रत्यक्ष मतदानाने केली जाते. धर्मगुरु, कॅटान्सचा नागरिक नसलेला व्यक्ती, वेडा , दिवाळखोर, सरकारी अधिकारी सांघिक कार्यपालिकेचा सभासद, राज्यसभेचा सभासद, मतदानासाठी अपात्र समजले जाते. राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधीची निवड प्रमाणबध्द प्रतिनिधीत्वाच्या यादी पध्दतीनुसार केली जाते. संपूर्ण कॅटॉन्स हा मतदार संघ असतो त्यातून जितके प्रतिनिधी निवडून द्यायचे असतील तितक्या उमेदवारांच्या नावांची यादी प्रत्येक राजकिय पक्ष तयार करतो.मतदार यादीला मतदान करताना प्रत्येक पक्षाला ज्या प्रमाणे मते मिळातात त्याप्रमाणात त्याचे प्रतिनिधी निवडून येतात.

**कार्यकाल**

राष्ट्रीय सभेच्या कार्यकाल ४ वर्षाचा आहे.कार्यकाल संपण्यापुर्वी राष्ट्रीय सभा बरखास्त करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला नाही.परंतू लोक निर्णयातून जनतेने पुर्ण किंवा आंशिक घटना दुरुस्ती विधेयक पास केल्यानंतर घटनादुरुस्ती विधेयका बाबत दोन्ही सभागृहात मतभेद निर्माण झाल्यास राष्ट्रीय सभा बरखास्त करुन नविन निवडणुका घेतल्या जातात.प्रत्येक चार वर्षानंतर ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी राष्ट्रीय सभेची निवडणुक होते.

**पदाधिकारी**

राष्ट्रीय सभेचे सभासद आपल्या मधुनच अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड एका वर्षासाठी करतात.अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेही एकाच कॅटान्स मधुन निवडुन आलेले प्रतीनिधी असु नये असा संकेत आहे.तसेच पुन्हा त्याच पदावर त्याची निवड होऊ शकत नाही परंतु उपाध्यक्ष पुढील वर्षी अध्यक्ष म्हणुन निवडला जाऊ शकतो.सभापतीचे पद हे गौरवाचे प्रतीष्ठेचे पद आहे.सभागृहातील कामकाज नियमानुसार चालविण्याची जबाबदारी सभापतीवर आहे.सभागृहात चर्चला आलेल्या ठरावावर समान मते पडल्यास निर्णायक मत देतो.तो सांघीक विधीमंडळाच्या संयुक्त बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषवितो.अध्याक्षाचा अनुपस्थितीत उपाध्यक्ष कामकाज पाहतो.

**अधिवेशने**

राष्ट्रीय सभेची अधिवेशने राज्यसभेच्या अधिवेशनासोबत होते.मार्च, जुन, सप्टेंबर, डिसेंबर या महीन्यात वर्षातुन चार बैठकी होतात.एखाद्या महत्वाच्या विषयावर दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक होऊ शकते, राष्ट्रीय सभेच्या १/४ सभासदांनी किंवाप १/४ घटकराज्याची विनंती केल्यास दोन्ही सभागृहाची संयुक्त बैठक बोलावली जाते.

**गणपुर्ती**

राष्ट्रीय सभेचे कामकाज सुरु होण्यासाठी १०१ सभासद उपस्थित असणे आवश्यक आहे.राष्ट्रीय सभेचे सर्व निर्णय बहुमताचे आधारे घेतले जातात.

अशा प्रकारे सांघिक विधीमंडळातील राष्ट्रीय सभा या सभागृहाची रचना आहे.

**२. राज्यसभा (Council Of States)**

स्विर्व्झलंड च्या सांघिक विधीमंडळाचे राज्यसभा व द्वितीय (वरिष्ठ) सभागृह असुन कॅटॉन्सचे प्रतीनिधीत्व करणारे सभागृह आहे. त्यात सर्व कॅटॉन्सना समान प्रतीनिधीत्व देण्यात आले आहे.इतर देशातील वरीष्ठ सभागृह प्रमाणे हे कमकुवत सभागृह नाही.कारण येथे या सभागृहाला राष्ट्रीय सभेच्या बरोबरीत अधिकार आहेत.

**रचना**

संघराज्य पध्दतीला अनुरुप सर्व पुर्ण व अर्ध कॅटॉन्सला राज्यसभेत समान प्रतीनिधीत्व देण्यात आले आहे.पुर्ण कॅटान्स मधुन दोन व अर्ध कॅटान्स मधुन १ प्रतीनिधी राज्यसभेत पाठविता येते. स्विर्व्झलंड मध्ये २० पुर्ण कॅटान्स व ६ अर्धकॅटान्स आहे.त्यामुळे राज्यसभेत ४६ सभासद आहेत.सुरवातीला येथे १९ पुर्ण व ६ अर्ध फॅन्नास असल्याने या सभागृहाची सभासद संख्या ४४ एवढी होती.

**निवडणुक**

राज्यसभेच्या सभासदाची पात्रता व निवडणुकीची पध्दती ठरविण्याचा अधिकार कॅटॉन्सला दिला आहे. त्यामुळे कॅन्टासपरत्वे हि निवडप्रक्रीया भिन्न भिन्न आढळते.आपल्या प्रतिनिधीची निवड काही कॅटान्समध्ये जनता प्रत्यक्ष मतदानाने करतो.तर काही कॅटान्स मध्ये विधीमंडळाचे सभासद त्याची निवड करतात.काही कॅटान्स मध्ये नागरिकाच्या सभेकडुन त्याची निवड केली जाते.

आपल्या प्रतिनिधीचे वेतन भत्ते इ.ठरविण्याचा अधिकार प्रत्येक कॅटॉन्सला आहे.त्यामुळे त्यामध्ये सुध्दा भिन्नता आढळून येते.

**कार्यकाल**

राज्यसभेच्या सदस्यांचा कार्यकाल सारखा नसतो. प्रतिनिधीचा कार्यकाल कॅटान्सकडुन ठरविला जातो.प्रत्येक कॅटान्सच्या प्रतिनिधीच्या कार्यकाल वेगवेगळा आहे. उदा. येथे कॅटान्सच्या प्रतिनिधीचा कार्यकाल ४ वर्षाचा काही ३ काही २ तर काही १ वर्ष असा कार्यकाल आहे.काही कॅटान्स कार्यकाल संपण्यापुर्वी सुध्दा आपल्या प्रतिनिधीला

परत बोलावु शकतात.

**पदाधिकारी**

घटनेनुसार एका अधिवेशनासाठी अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड केली जावी अशी तरतुद आहे.परंतु परंपरेनुसार एका वर्षासाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड राज्यसभेचे सभासद आपल्या मधुन करतात.लागोपाठ दोनदा अध्यक्ष व उपाध्यक्ष होता येत नाही संकेतानुसार उपाध्यक्ष पुढल्या वर्षी अध्यक्ष म्हणुन निवडला जातो.सभागृहाच्या कामकाजाचे संचालन, संयोजन व नियंत्रण हे कार्य अध्यक्षाचे आहे.त्याला निर्णायत्मक देण्याचा अधिकार आहे.सभागृहातील सदस्याच्या विशेषाधिकाराचे संरक्षण अध्यक्षाकडुन केले जाते.अध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष कामकाज पाहतो.

अशा प्रकारे स्वित्सर्लंड मधील सांघीक विधीमंडळाच्या राज्यसभा या सभागृहाची रचना आहे.

**सांघीक विधीमंडळाचे अधिकार व कार्य**

स्विर्झलंडमधील सांघीक विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे अधिकार सारखे आहे.डॉ.सी.एफ स्टॉग च्या मते " स्विर्झलंड च्या केंद्रीय कार्यकारीमंडळा प्रमाणे कायदेमंडळ सुध्दा आगळे वेगळे आहे.जगातील हेच एकमेव कायदेमंडळ आहे की, ज्यात वरिष्ठ सभागृहाचे अधिकार कोणत्याही बाबतीत कनिष्ठ सभागृहापेक्षा वेगळे नाही." आणि म्हणुन येथे दोन्ही सभागृहाची अधिकार व कार्ये विचारात घेतांना सांघिक विधिमंडळाची अधिकार व कार्ये म्हणुन विचारात घेतली आहेत.

**अ) कायदेविषयक अधिकार :-**

हे एक कायदा तयार करणारे मंडळ असुन त्या दृष्टीने

सांघीक विधीमंडळाला कायदेविषेयक व्यापक सत्ता व अधिकार प्राप्त झाले आहे पुढील प्रमाणे.

१. संविधान अंतर्गत सांघिक अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सर्व विषयावर कायदे बनविणे.

२. संघीय अधिकाऱ्याच्या निवडीसंबंधी सर्व कायद्याची निर्मीती करणे.

३. सांघिक शासनाच्या विभागाची निर्मीती, कर्मचाऱ्याचे वेतन भत्ते तसेच सेवा अटी इ. बाबत कायदे बनविणे.

४. सांघिक विधीमंडळ घटनादुरुस्ती कार्यात महत्वाचे योगदान देते.

५. अध्यादेश जारी करणे इ. कार्य

वरील प्रकारची विधीविषयक कार्य सांघिक विधीमंडळाची असली तरी करण्याची अंतिम सत्ता फेडरला असेंब्ली जवळ नसुन जनतेजवळ आहे.प्रत्यक्ष लोकशाहीची साधन, जननिर्णय आणि विधी उपक्रमामुळे फेडरला असेंब्ली ची सत्ता मर्यादीत झाली आहे.

**२. शासन विषयक अधिकार :-** स्विस व्यवस्थेमध्ये सांघिक विधि मंडळाला सर्वोच्य संस्था म्हणुन प्रशासकीय (कार्यकारी) क्षेत्रामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्या अंतर्गत हे मंडळ पुढील कार्य पार पाडते.

१. सांघीक कार्यपालीकेचे सदस्य तसेच त्याचे अध्यक्ष व उपाध्यक्ष सांघीक न्यायालयातील न्यायाधीश, सेनापती केंद्रीय विमा निगम मधील सदस्य इत्यादीची निवड सांघीक विधीमंडळ करते.

२. सांघीक विधीमंडळ परदेशाशी तह करार करते ती सांघिक सेनेवर नियंत्रण ठेवते. सांघिक प्रशासनावर नियंत्रण ठेवणे, युध्दाची घोषणा करणे, सांघिक कार्यपालीकेतील सदस्यांना धोरण व प्रशासन या बाबत प्रश्न विचारु शकते आणि त्यांच्या खात्याची चौकशी करु शकते.सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे वेतन भत्ते, ठरविणे इ.कार्य करते.

३. कॅटॉन्स प्रदेशाचे व त्याच्या राज्यघटनेचे संरक्षण करण्याची जबाबदारी फेडरल असेंब्लीची आहे. कॅटान्स मार्फत होणारे परदेशाशी तह करार, कॅटान्सचे आपआपसात होणारे करार याचे अनुमोदन सांघिक विधीमंडळाच करते.कॅटान्सच्या राज्यघटनेतील प्रस्ताविक दुरुस्त्या तपासण्याचा व त्याला मान्य करण्याचा अधिकार सांघीक विधीमंडळाला आहे.

**क) अर्थविषयक अधिकार**

या मंडळाला अर्थविषयक बाबतीत सुध्दा महत्वपुर्ण अधिकार आहेत. त्यानुसार सांघिक कार्यकारीविभागाद्वारे निर्माण केलेल्या वार्षिक अंदाजपत्रकाला सांघिक विधीमंडळाची मंजुरी आवश्यक आहे. स्विर्व्झलंड च्या संपुर्ण अर्थव्यवस्थेवर फेडरल असेंब्लीचे नियत्रण आहे. सांघिक विधीमंडळाच्या मंजुरी शिवाय संघराज्याचे कोणतेही आर्थिक व्यवहार पार पाडता येत नाही. सरकारच्या जमाखर्चाच्या हिशोबाची छानणी करण्याचा अधिकार सांघिक विधीमंडळाला आहे. कॅटान्सला आर्थिक मदत मंजुर करण्याचा अधिकार फेडरल असेंब्लीला आहे.

**ड) न्यायविषयक अधिकार**

स्विस मध्ये देशातील सर्वोच्च संस्था म्हणुन न्यायविषयक अधिकार सुध्दा या

विधिमंडळाला प्राप्त झालेले आढळतात.

१. कोणत्याही देशाच्या राष्ट्रप्रमुखास असलेल्या दयेचा अधिकार स्विर्व्झलंड च्या सांघिक विधीमंडळाला आहे. त्यानुसार एखाद्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करु शकते किंवा माफ करु शकते.

२. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असेब्ली कडुन निवडले जातात.

३. संघसरकार व कॅटॉन्स यांच्यातील विवाद, कॅटॉन्स मधील परस्पर विवाद आणि विधीमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्यातील विवादाचा निर्णय फेडरल असेंब्लीकडुन दिला जातो.

४. नागरिकांनी संघसरकार किंवाव कॅटॉन्स सरकार विरुध्द केलेल्या तक्रारीवर फेडरल कॉन्सीलच्या प्रशासकीय निर्णयाविरुध्द अपिल ऐकण्याचा अधिकार सांघिक विधीमंडळाला आहे.

अशाप्रकारे स्विस मध्ये सांघिक विधिमंडळाची दोन्ही सभागृहे वरील अधिकारा अंतर्गत विभिन्न कार्ये पाड पाडतात. सांघिक विधीमंडळाच्या वरील अधिकार क्षेत्राच्या आधारे सांघिक विधीमंडळाला, प्रशासकीय वित्तीय व न्यायीक क्षेत्रात व्यापक सत्ता दिली आहे हे स्पष्ट होते.आणि त्या अधिकारामुळे स्विस सांघिक विधिमंडळाचे स्विस व्यवस्थेत सर्वेच्च क्षेत्रात व संस्थावर वर्चस्व प्रस्थापित झालेले आढळून येते. येथे दोन्ही सभागृहे अधिकाराच्या दृष्टीने समान दर्जाची आहेत.ब्राईसच्या मते, "स्विर्व्झलंड मधील सांघीक विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाला अमेरीकेपेक्षाही अधिक प्रमाणात समान अधिकार प्राप्त झाले आहे."दोन्ही सभागृहाचे अधिकार समान असुन ही दोन्ही सभागृहात प्रतिस्पर्धा दिसत नाही

**स्विव्झलेंडचे कायदेमंडळ**

१२) राष्ट्रीय परिषदसभासदांचाकार्यकाळकीतीवर्षअसतो.
(अ) दोन (ब)चार (क) पाच (ड) एक (ड)

१३) स्विस मधेफेडरलअसेब्लीचीअधिवेशनेकोणत्यामहीन्यातहोतात.
(अ)मार्च, जुन, जुलै, सप्टेंबर
(ब) मार्च, जुन, सप्टेंबर, डिसेंबर **(ब)**
(क) जुन, ऑगस्ट, नोव्हेंबर, डिसेंबर (ड) यापैकीनाही

१४) सांधिकविधीमंडळाचेवरिष्ठ व व्दितीय सभागृहकोणते ?
(अ) राष्ट्रीयसभा (ब) सिनेट (क) राज्यसभा (ड) प्रतिनीध

ाीसभागृह (क)

१५) राज्यसभासभागृहातपुर्णकॅन्टासलाकीतीप्रतिनीधीपाठविण्याचाअधि ाकारआहे

(अ) दोन (ब)तिन (क) एक (ड) चार

(अ)

१६) राज्यसभासदस्यांचाकार्यकाळकीतीवर्षअसतो ?

(अ) दोनवर्ष (ब)चारवर्ष (क) कॅन्टासपरत्वेभिन्न (ड) यापैकीनाही (क)

१७) राज्यसभापदाधिकायांचाकार्यकाळकीतीवर्षअसतो ?

(अ) दोनवर्ष (ब) एक वर्ष (क) तिनवर्ष (ड) चारवर्ष

(ब)

१८) राज्यसभेचीसभासद संख्या कीती ?

(अ) ४० (ब) ४४ (क) ४६ (ड) ४८

(क)

१९) अर्धकॅन्टासलाराज्यसभेतकीतीप्रतिनीधी वाढविण्याचाअधि ाकारआहे.?

(अ) दोन (ब) तिन (क)चार (ड) एक

(ड)

२०) स्विस मध्येकोणतेसभागृहअधिकाऱ्याच्या दृष्ट्रीनेश्रेष्ठआहे ?

(अ) राष्ट्रीय सभा (ब)राज्यसभा (क) समानअधिकार (ड) यापैकीनाही (क)

२१) राज्यसभासभागृहातकॅन्टसलाकसेप्रतीनीधीत्वआहे ?

(अ) समान (ब)लोकसंख्येयाआधारावर (क) क्षेत्रफळाच्याआध ाारे (ड) यापैकीनाही ()

२२) राष्ट्रीय मंडळसभागृहमतदारसंघातीलकीतीलोकसंख्येला एक प्रतीनीधीहेप्रमाणअसते

(अ) ३० हजार (ब) ४० हजार (क) २४ हजार (ड) २० हजार (क)

२३) स्विस मधेमतदाराचीवयोमर्यादाकितीवर्षआहे.?

(अ) १८ वर्ष (ब)२० वर्ष (क) २१ वर्ष (ड) २५ वर्ष (अ)

२४) स्विव्झर्लंड मध्येकायदेमंडळालाकाय म्हणतात ?
(अ) फेडरलकौन्सील (ब)फेडरलअसेब्ली
(क) नॅशनलकौन्सील (ड)कौन्सीलऑफस्टेट (ब)

२५) फेडरलअसेंब्लीचीदोनसभागृहकोणती ?
(अ) लोकसभा व राज्यसभा
(ब) हाऊसऑफकॉमन्स व हाऊसऑफलॉर्डस (ड)
(क) प्रतिनिधीगृह व सिनेट (ड)राष्ट्रीय मंडळ व राज्यसभा

२६) फेडरलअसेंब्ली व राष्ट्रीय मंडळ सभागृह बरखास्त झाल्यास …………
(अ) फेडरल कौन्सीलचा कार्यकाळ संपतो
(ब) राज्यसभाबरखास्तहोते (अ)
(क) फेडरलकौन्सीलकायमराहते (ड) यापैकीनाही

२७) सांधिकविधीमंडळाचेप्रथम व कनिष्टसभागृहकोणते ?
(अ) राज्यसभा (ब) प्रतिनीधीसभा (क) राष्ट्रीय मंडळ
(ड) लोकसभा (क)

२८) राष्ट्रीय मंडळसभागृहाची घटनेनुसारकितीसभासद संख्या राहु शकते ?
(अ) २०० (ब) २५० (क) ३०० (ड) ३२० (अ)

२९) राष्ट्रीय परिसदेचा (छंजपवदंस ब्वनदबपस) चा कार्यकाळ किती वर्ष असतो ?
(अ) दोनवर्ष (ब) चारवर्ष (क) तिनवर्ष (ड) सहावर्ष (ब)

३०) घटना दुरूस्ती विधेयकाबाबत दोन्ही सभागृहात मतभेत झाल्यास काय होते…………..
(१) राष्ट्रीय मंडळसभागृहबरखास्त
(२) राज्यसभाबरखास्तहोते
(३) फेडरलकौन्सीलचाकार्यकाळसंपतो.
(अ) १ व ३ (ब) २ व ३ (क) १ व २ (ड) यापैकीनाही (अ)

३१) कौन्सीलऑफस्टेटसभागृहाचीगणसंख्या कीती ?
(अ) विस (ब)तेविस (क) चोविस (ड) पंचविस (क)

३२) राष्ट्रीय परीसदेचापदाधिकारीकोणनिवडतात ?
(अ) राष्ट्रीय मंडळसभासद (ब)कार्यपालीक
(क) न्यायपालीका (ड) यापैकीनाही (अ)

३३) सांधिक निधीमंडळाच्या पदाधिकाऱ्याचा कार्यकाळ किती वर्षाचा असतो?
(अ) दोनवर्ष (ब)तिनवर्ष (क) एक वर्ष (ड) चारवर्ष (क)

३४) सांधिकविधी मंडळाच्या संयुक्त अधिवेशनाचे अध्यक्षस्थान कोण भुसवीतो ?
(अ) राज्यसभेचा अध्यक्ष (ब) सांधिकन्यायालयाचा अध्यक्ष
(क) स्वीसचाराष्ट्रध्यक्ष(ड) राष्ट्रीय मंडळाचा अध्यक्ष (ड)

३५) स्विव्झर्लंडमध्ये विध्येयकाचा अधिकार कुणाला आहे?
(अ) सांधिकविधीमंडळाला (ब)सांधिककार्यपालिकेला
(क) सांधिकन्याय (ड) यापैकीनाही (अ)

३६) जगातील कायदेमंडळांच्या तुलनेत स्विसकायदेमंडळाला वेगळेपण कशात आहे ?
(अ) दोन्हीसभागृहांचेअधिकारवेगवेगळे
(ब) दोन्हीसभागृहीअधिकारांच्याबाबतीतसमान
(क) राष्ट्रीय मंडळसभागृहाचे शक्तीशालीस्थान
(ड) यापैकीनाही (ब)

३७) राष्ट्रीय मंडळ सभासद होण्यासाठी वयाची कीती वर्ष पुर्ण झालेली असावी ?
(अ) १८ वर्ष (ब) २१ वर्ष (क) २२ वर्ष (ड) २० वर्ष (ड)

३८) स्विव्झर्लंडमध्येन्यायालयालाकाय म्हणतात ?
(अ) फेडरलट्रिव्युनल (ब) फेडरलकोन्सील
(क) फेडरलअसेंब्ली (ड) यापैकीनाही (अ)

❑❑❑

**04**

# स्विर्झलंड न्यायमंडळ

## (Judiciary of Switzerland-Fedral Tribunal)

स्विर्झलंड मध्ये सांघिक न्यायालयाची तरतुद १८४८ च्या संविधानाने केली गेली १८७४ च्या संविधानाने सांघिक न्यायमंडळात अधिकार क्षेत्रात वाढ केली स्विर्झलंड मध्ये संघराज्य पातळीवर फक्त सांघीक न्यायमंडळ हे एकमेव न्यायालय आहे. या न्यायालयाच्या अन्यत्र कोठेही शाखा नाहीत या न्यालयाची साखळी कॅटान्समधील न्यायालयाला जोडण्यात आलेली नाही.या न्यायालयाची रचना पुढील प्रमाणे आहे.

**१. न्यायाधीशाची संख्या**

स्विर्झलंड संविधानानुसार या सांघिक न्यायालयाच्या न्यायाधिशाची संख्या निश्चीत केलेली नाही. न्यायधिशाची संख्या ठरविणाचा अधिकार सांघिक कार्यपालीकेला आहे. सांघीक न्यायालयात २६ ते २८ न्यायाधीश व ११ ते १३ पर्यायी न्यायधीश व असु शकतात प्रत्यक्षात २६ न्यायाधीश व १२ वैकल्पीत न्यायधीश आहे. त्याची निवड सांघिक विधीमंडळाच्या संयुक्त अविवेशनात केली जाते. न्यायाधिशाच्या अनुपस्थितीत मधुन एका अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणुन दोन वर्षासाठी निवड केली जाते.

**२. न्यायाधिशांची पात्रता**

स्विस घटनेने सांघिक न्यायालयाच्या न्यायाधिशाची पात्रता व योग्यतेचा उल्लेख केलेले नाही. तरी तो सांघिक विधीमंडळाच्या सदस्य होण्यास पात्र असावा सांघिक विधीमंडळाचे सदस्य, सरकारी अधिकारी, व कर्मचारी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायधीश पदावर निवडुन द्यावे अशी परंपरा आहे. निरनिराळया भाषीक आणि धार्मिक समुदायाना तसेच राजकीय पक्षाना प्रतिनिधीत्व मिळेल याची काळजी घेतली जाते.गुणवत्तेच्या आधारावर न्यायाधिशाची निवड होते आणि त्याची इच्छा असे पर्यंत पुन्हा पुन्हा निवडुन

दिले जाते.न्यायधिशाच्या निवडणुकीवर पक्षीय राजकारणाच्या प्रभाव पडु दिला जात नाही.

**३. न्यायाधिशाचा कार्यकाल**

न्यायधिशाचा कार्यकाल ६ वर्षाचा असतो पण त्यांनाच पुन्हा पुन्हा निवडुन दिले जाते.त्यामुळे त्यांची इच्छा असेपर्यंत ते आपल्यापदावर राहु शकतात.त्यामुळे न्यायधिशांना स्थिरता प्राप्त झालेली आढळते.

**४. न्यायाधिशांचे वेतन व भत्ते**

सांघिक न्यायालयाच्या प्रत्येक न्यायाधिशास ४३००० स्वीस, फ्रँक इतके वेतन दिले जाते.या व्यक्तीरीक्त अध्यक्ष ३६००० व उपाध्यक्षकाला २४००० फ्रँक वार्षीक भत्ता दिला जातो.पर्यायी न्यायाधिशांना नियमीत वेतन नाही. ज्या दिवशी काम केले जाते.त्या दिवशी चा भत्ता मिळतो कमीत कमी १० वर्ष काम केलेल्या न्यायधिशांना निवृत्ती वेतन दिले जाते.

**५. सांघिक न्यायालयाचे सचिवालय व विभाग**

सांघिक न्यायालयाचे मुख्यालय वॉंड कॅटान्स मधील ल्युसाने शहरात आहे. कार्याच्या सोयीसाठी सांघिक न्यायालयाला चार विभागात विभागले आहे. पहिला विभाग सार्वजनिक कायद्याशी संबंधीत आहे. दुसरा कर्ज व दिवाळखोरीसाठी तिसरा व चौथ विभाग दिवानी खटल्या बाबत आहे. फौजदारी विषयासाठी ज्युरी पध्दती आहे. कोणत्याही खटल्याच्या सुनावणीसाठी १२ ज्युरी सदस्याची उपस्थिती आवश्यक आहे.

**सांघिक न्यायालयाचे अधिकार व कार्य**

स्विर्झलंडच्या सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराचे क्षेत्रात अभ्यासाच्या सोयीने चार भाग पाडता येतात.१) दिवाणी अधिकार क्षेत्र २) फौजदारी अधिकार क्षेत्र ३) संवैधानिक अधिकार क्षेत्र ४) प्रशासकीय अधिकार क्षेत्र

**१) दिवाणी अधिकार व कार्य क्षेत्र**

दिवाणी अधिकार क्षेत्र अंतर्गत सांघिक न्यायालय प्रारंभीक (ORIGINAL) आणि अपिलीय (Appellate) असे दोन प्रकारचे खटले पहातो घटना कलम ११० नुसार स्विस सांघिक न्यायालयाचे दिवाणी अधिकार व कार्य पुढील प्रमाणे.

१. संघ सरकार व कॅटान्स सरकार यांच्यात होणारे वाद

२. विभीन्न कॅटान्स मधील परस्परातील वाद

३. कॅटॉन्स, निगम किंवा व्यक्ती मधील वाद ज्याची किंमत ४०००० फ्रँक

असेल

४. कॅटान्स किंवा कॅन्टास मधील नागरिकत्वा संबंधी वाद

५. रेल्वे मार्गाशी संबंधीत दावे

६. कोणत्याही कॅटान्सचा नागरिक नसलेल्या व्यक्ती संबंधी दावे.

सांघिक न्यायालयाच्या अपिलीय अधिकार क्षेत्रात कॅटान्स द्वारा उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपिल संबंधी विवाद येतात. घटना कलम १११ मध्ये स्पष्ट केले की जर कोणत्याही खटल्या संबंधी दोन्ही पक्ष सहमत असेल कमीम कमी १० हजार फ्रँक वरील खटला असेल तर सांघिक न्यायालयात अपिल करता येते.

**ब) फौजदारी अधिकार व कार्य क्षेत्र**

सांघिक संविधानाच्या ११२ कलमानुसार या न्यायालयात पुढील फौजदारी विवाद संबंधीत अधिकार क्षेत्र प्रदान करण्यात आले आहे.

१. संघसरकारच्या कायद्याचा भंग करणारे आणि संघ सरकारच्या विरुध्द बंड देशद्रोह किंवा हिंसात्मक स्वरुपाचे फौजदारी खटले.

२. संघसरकारला सैनिकी हस्तक्षेप करावा लागेल असे राजकीय गुन्हे

३. आंतरराष्ट्रीय सैनिकी हस्तक्षेप करावा लागेल असे राजकीय गुन्हे

४. संघसरकारच्या वरिष्ठ अधिकाज्या विरुध्द लावण्यात आलेले गंभिर आरोप

५. अन्य सर्व फौजदारी खटले ज्याला कॅटान्स सरकार सांघिक विधीमंडळाच्या स्वकृतीने संघ न्यायालयाला सोपविते.

**क) संविधानिक अधिकार व कार्यक्षेत्र :-**

घटना कलम ११३ नुसार स्विर्झलंडच्या सांघिक न्यायालयाचे पुढील प्रकारचे संविधानीक अधिकार क्षेत्र आहे.

१. कॅटान्सच्या विधीमंडळानी निर्माण केलेल्या कायद्याच्या वैधतेसाठी विवाद.

२. कॅटान्सच्या प्रशासकीय निर्णयासंबंधी वैधतेचा प्रश्न

३. संघसरका व कॅटान्स सरकार यांनी निर्माण केलेल्या कायद्यामध्ये संघर्ष निर्माण झाल्यास त्यासंबधी खटला.

४. कॅटान्स मधील निवडणुका आणि धार्मीक स्वातंत्र्यासंबधी वाद

५. सांघिक राज्यघटना आणि कॅटान्सच्या राज्यघटना, कॅटान्सची परस्पराशी आणि विदेशाची केलेले करार, संघ सरकारने विदेशाशी केलेले तह करार यांच्याशी संबधीत असणारे विवाद.

६. कॅटान्सची तयार केलेले कायदे सांघीक राज्यघटनेच्या विरुध्द असतील तर अशा कायद्याला घटना बाह्य घोषीत करुन रद्द करण्याचा अधिकार फेडरला ट्रिब्युनलला आहे.

७. संघसरकारच्या कायद्याच्या अन्वार्थ लावण्याचे कार्य फेडरला ट्रिब्युनल कडुन केले जाते.

८. सांघीक न्यायालय स्विव्झ नागरिकाच्या घटनादत्त अधिकाराचे संरक्षण करते नागरिकाच्या घटनातमक अधिकारावर झालेल्या अतिक्रमणाचे खटलेबाबत अपिल सांघीक न्यायालयात करते.

**ड) प्रशासकीय अधिकार व कार्यक्षेत्र :-**

सांघीक न्यायमंडळात १९२८ मध्ये प्रशासकीय न्यायविभाग स्थापन करुन मर्यादीत प्रमाणात प्रशासकीय अधिकार प्राप्त झाले आहे. त्यानुसार

१. संघसरकारच्या क्षेत्रातील प्रशासकीय दावे ऐकण्याचा अधिकार आहे.

२. संघसरकारच्या अधिकाऱ्याविरुध्द लावण्यात आलेल्या शिस्तभंगासंबधी आरोपाची छानणी करण्याचा अधिकार या न्यायालयाला आहे.

३. संघसरकार आणि कॅटान्सची केलेल्या कराराचे पालन न केल्यामुळे निर्माण झालेल्या वादविवादाच्या निर्णय या न्यायालयाकडुन दिला जाते.

४. कॅटान्स सरकारच्या प्रशासकीय आदेशाची वैधता सांघिक न्यायलयाने ठरविली आहे.

वरील अधिकार क्षेत्राच्या विवेचनाच्या आधारे स्वित्सर्लडमधील सांघीक न्यायालय वास्तवात लोकतांत्रीक अधिक न्यायीक कमी आहे.त्याला सांघीक विधीमंडळाने केलेला कायद्याची वैधानीकता तपासण्याचा अधिकार नाही.कारण कायद्याचा स्वीकार अथवा अस्विकार करणाची अंतिम सत्ता लोकांच्या हाती आहे.न्यायीकपुर्णाविलोकनाचा अधिकार नसुनही हे न्यायालय महत्वपुर्ण आहे व त्याला व्यापक अधिकार मिळाले आहे.

## स्विव्झलेंडची न्यायव्यवस्था

३८) स्विव्झर्लंडमध्येन्यायालयालाकाय म्हणतात ?
(अ) फेडरलट्रिव्युनल (ब) फेडरलकोन्सील (अ)
(क) फेडरलअसेंब्ली (ड) यापैकीनाही

३९) सांधिकन्यायालयाची (Fedral Tribunal) तरतुद कोणत्या

सांविधानाने केली ?
(अ) १८५४ चेसंविधान (ब) १८७४ चेसंविधान
(क) १८४८ चेसंविधान (ड) यापैकीनाही (क)

४०) स्विसन्यायपालीकेचेवैशिष्टकोणते ?
(अ) निर्वाचितन्यायपालीका (ब) न्यायपालीकेचीसबोच्या
(क) न्यायधिशांचीनियुत्ती (ड) यापैकीनाही (अ)

४१) न्यायधिशांचाकार्यकाळकिती ?
(अ) दोनवर्ष (ब)चारवर्ष(क) सहावर्ष (ड) सातवर्ष (क)

४२) स्विस मध्येन्यायधिशांचीनिवडकोणकरते ?
(अ) सांधिककार्यपालीका (ब) सांधिकविधिमंडळ
(क) जनता (ड) यापैकीनाही (ब)

४३) कमीतकमी किती वर्ष काम केलेल्या न्यायधिशांना निवृत्ती वेतन प्राप्त होते.
(अ) पाचवर्ष (ब)सहावर्ष(क) आठवर्ष (ड) दहावर्ष

४४) न्यायलयातीलपदाधिकाऱ्याचाकार्यकाळकितीवर्षचाअसतो ?
(अ) दोनवर्ष (ब) तिनवर्ष (क) चारवर्ष (ड) पाचवर्ष (अ)

४५) स्विस मधीलसांधिकन्यायालयाचेमुख्यालय कोठेआहे ?
(अ) बर्न (ब) ज्युरीच (क)ल्युसाने (ड) यापैकीनाही (क)

४६) स्विसन्यायालयातीलन्यायधिशांचीनिवडकोठेहोते ?
(अ) सांधिककार्यपालीकेत
(ब) सांधिक विद्यिमंडळाच्या संयुक्त बैठकीत
(क) जनतेत (ड) यापैकीनाही (क)

४७) स्विव्झर्लंड मध्ये न्यायधि शांसदर्भात कोणती प्रथानिर्मान झालेली आढळते ?
(अ) ईच्छाअसेपर्यतनिवडकरणे
(ब) एकाव्यक्तीलादोनवेळान्यायधिशबनता येणार नाही (अ)

❑❑❑

05

# स्विर्व्झलंड मधील प्रत्यक्ष लोकशाही

## (Swiss-Direct Democracy)

आधुनिक युग हे लोकशाहीचे युग आहे.जगातील बहुतांश लोकतंत्रात्मक शासन प्रणाली आहे. परंतु प्रतिनिधीक अथवा अप्रत्यक्ष स्वरुपाची आहे. स्विर्व्झलंडची राज्यव्यवस्था जगातील प्रत्यक्ष लोकशाहीचे एकमेव उदाहरण आहे.प्रत्यक्ष लोकशाहीत जनतेद्वारा प्रत्यक्षात सार्वभौम सत्तेचा वापर केला जातो.या शासन पध्दतीत जनता एका ठिकाणी एकत्र येवुन शासनासंबंधी धोरण आणि कायद्याची निर्मीती करते, कायद्याला क्रियान्वित करतात आणि सरकारी अधिकाऱ्याची नियुक्ती करतात. स्विर्व्झलंडच्या एक पुर्ण व चार अर्ध कॅंटान्स मध्ये प्रत्यक्ष लोकशाही आहे. स्विर्व्झलंडमध्ये जनमत प्रदर्शन, विधीउपक्रम, प्रत्यावहन ही प्रत्यक्ष लोकशाहीची प्रमुख साधने आहे.

स्विर्व्झलंडच्या प्रत्यक्ष लोकशाहीची प्रशंसा करतांना ब्रांईस म्हणतो, 'जगातील आधुनिक लोकशाहीत खऱ्या लोकशाहीचे अध्ययनाच्या दृष्टीने स्विर्व्झलंड सर्वाधिक महत्वपुर्ण आहे' प्रत्यक्ष लोकशाहीच्या साधनामुळे स्विस जनतेला राजकीय निर्णय प्रकीया मोठ्या प्रमाणावर प्रभावित करणे शक्य होते. म्हणून स्विर्व्झलंड मधील शासनव्यवस्थेचे अध्ययन करतांना प्रत्यक्ष लोकशाही साधनाचा विचार करावा लागतो.

स्विर्व्झलंड मधील प्रत्यक्ष लोकशाहीची साधने

**१. जनमतप्रदर्शन (Referendum)**

जनमतप्रदर्शन याला, लोकनिर्णय, जनपृच्छा, जनमतसंग्रह या सारख्या शब्दाचा उपयोग केला जातो.हे सर्व पारिभाषीक शब्द एकच अर्थ व्यक्त करतात. कायदेमंडळाने निर्माण केलेला एखादा कायदा किंवा घटनादुरुस्ती विधेयक जनतेला मान्य आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी मतदान घेणे याला जनमतप्रदर्शन म्हणतात नागरिकानी बहुमताने

मान्यता दिली तरच तो कायदा अंमलात येतो अन्यथा रद्द होतो. जनमत दर्शनाचे दोन प्रकार आहे.

**अ. अनिवार्य जनमतदर्शन :-**

जनमतदर्शन घेतल्या शिवाय विधेयकाचे रुपांतर कायद्यात होणार नाही. अशी तरतुद स्विस संविधानात करण्यात आली असेल त्याला अनिवार्य जनमतदर्शन म्हणता येईल. स्विर्झलंड मध्ये संघराज्य स्तरावर प्रत्येक घटनादुरुस्तीसाठी जनमतदर्शन आवश्यक आहे. कॅटान्स स्तरावर काही कॅटान्स मधील विधीमंडळाने मंजुर केलेल्या प्रत्येक विधेयकासाठी जनमतदर्शन आवश्यक असल्याची तरतुद त्यांच्या संविधानात केवळ महत्वपुर्ण विषयासाठीच जनमतदर्शन आवश्यक असल्याची तरतुद केली आहे.

**ब. ऐच्छिक जनमतदर्शन :-**

संविधानानुसार काही विषयावर जनमतदर्शन घेणे आवश्यक नाही अशा विधेयकावर जनमत दर्शन घ्यावे अशी मागणी जनतेने केली तर जनमतदर्शन घेतले जाते. विधेयक मंजुर झाल्यावर ९० दिवसाचा आत ३० हजार स्विसमतदाराच्या सह्यासह ८ कॅटान्सने मागणी केल्यास जनमतदर्शन घेतले जाते.नागरिकानी बहुमताने त्या विधेयकाला मान्यता दिली तरच त्या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते अन्यथा ते रद्द होते.

**२. विधीउपक्रम (Initiative)**

विधी उपक्रमास, जनोपक्रम आरंभक, असे ही संबोधले जाते विधीउपक्रम म्हणजे विधीनियम तयार करण्यासाठी किंवा घटनादुरुस्ती करण्यासाठी जनतेने स्वत: पुढाकार घेणे होय. विधीउपक्रम या साधनाद्वारे स्विस जनता कोणत्याही महत्वपुर्ण विषयावर विधेयक तयार करावयास निर्वाचीत प्रतिनिधीला भाग पाडु शकते. विधी उपक्रम हे सकारात्मक स्वरुपाचे साधन असुन त्याला स्विस जनतेच्या हातातील तलवार असे संबोधले जाते.नागरिक स्वत: एखादे विधेयक किंवा घटनादुरुस्ती प्रस्ताव तयार करुन कायदेमंडळाकडे पाठवु शकतात. ५०,००० हजार नागरिकांनी अशा प्रकारचे विधेयक किंवा घटनादुरुस्ती प्रस्ताव कायदेमंडळ कडे पाठविलयास कायदेमंडळ त्यावर विचार विनिमय करुन जननिर्णय घेते नंतर ते नागरिकाच्या बहुमताने मंजुर किंवा नामंजुर केले जाते. या प्रक्रीयेला विधीप्रस्ताव किंवा विधीउपक्रम म्हणतात. **विधीउपक्रमाचे दोन प्रकार आहे.**

**अ. निर्मित विधीउपक्रम :**

निर्मित विधीउपक्रम म्हणजे नागरिक स्वत:च विधेयकाचा संपुर्ण मसुदा तयार करुन कायदेमंडळाकडे पाठवितात. विधेयकाच्या मसुद्यासोबत त्या विधेयकावर कायदेमंडळ त्वरीत चर्चा व्हावी असा विनंती अर्ज असतो या विनंती अर्जावर ५०,००० मतदार नागरिकांच्या सह्या असने आवश्यक आहे.त्या विधेयकावर सांघीक विधीमंडळात चर्चा केली जाते.जनतेने तयार करुन पाठविलेला विधेयकाचा मसुदा विधीमंडळातील सदस्यांनी बहूमताने मंजूर केला तर त्या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होते. जनतेकडून आलेल्या विधेयकाचा मसूदा विधीमंडळातील सदस्यांना योग्य नाही असे वाटत असेल तर विधीमंडळ त्यावर वेगळा मसुदा असणारे विधेयक तयार करते.एकाच विषयावर स्वतंत्र मसुदे असणारी विधेयके स्विस जनतेसमोर ठेवली जातात. स्विस जनता जनमतदर्शन या साधनाद्वारे कोणता विधेयकेचा मसुदा पसंत आहे हे ठरविते. नागरिकाने बहुमताने विधीउपक्रम मान्य अमान्य केला किंवा कायदेमंडळाने तयार केलेले विधेयक मंजुर केले तर नागरिकांनी तयार केलेले विधेयक रद्द होते.परंतु विधीमंडळाचे विधेयक फेटाळले गेले तर विधीमंडळ बरखास्त होते.

**ब) अनिर्मित विधीउपक्रम :**

स्वित्स नागरिक संपुर्ण विधेयक तयार न करता विधेयक किंवा घटनादुरुस्ती संबंधी काही मार्गदर्शक तत्वे तयार करुनच कायदेमंडळाकडे पाठवितात कायदेमंडळ त्या तत्वाशी सहमत असेल तर त्या तत्वानुसार विधेयक तयार करते आणि त्यावर जननिर्णय होते.

एखाद्या विषयावर विधेयक तयार करावे अशा विनंती अर्जावर पन्नास हजार नागरिकांच्या सह्या असणे आवश्यक आहे. स्विस जनतेकडुन आलेल्या विनंती अर्जाशी विधीमंळातील सदस्य सहमत असल्यास ते त्या विधेयकाचा मसूदा तयार करतात त्यावर चर्चा करुन तो बहूमताने मंजूर करतात. नागरिकांकडून आलेल्या विनंती अर्जामधील विषयावर विधेयकाची गरज नाही असे देखील विधीमंडळ सदस्यांना वाटू शकते अशा स्थितीत त्या विषयावर विधेयक तयार करावे किंवा नाही हा प्रस्ताव जनमतदर्शनासाठी संपुर्ण देशातील मतदारासमोर ठेवला जातो. संपूर्ण देशातील बहुसंख्य मतदारांनी पाठींबा दिला तर विधेयक तयार केले जाते.

**३. परत बोलविणे- (Recall)**

जनतेने निवडुन दिलेला प्रतीनिधी आपल्या कर्तव्याचे व जबाबदारीचे पालन करीत नसेल तर कार्यकाल संपण्यापुर्वी त्याला परत बोलवण्याचा अधिकार नागरिकाना

देण्यात आला आहे. विरीष्ट कॅटान्सचा नागरिकाना आहे. कॅटान्स राज्यसभेतील आपल्या प्रतीनिधीला परत बोलवु शकतात.काही कॅटान्स मध्ये बहुसंख्य नागरिकांनी मागणी केल्यास कॅटान्सचे विधीमंडळ बरखास्त करुन नविन निवडणुका घेतल्या जातात.

**४. खुल्या जागेतील विधीमंडळ (लॅन्डसजेमिन्डे)**

स्विर्व्झलंड मध्ये एक पुर्ण कॅटान्स तथा सहा अर्ध कॅटान्स मध्ये प्रारंभिक सभा आहे.त्याला खुल्या जागेतील विधीमंडळ किंवा लॅन्डसजेमिन्डे असे म्हणतात.यात कॅटान्सच्या सर्व नागरिक ठरलेल्या वेळी एकत्र येतात आणि आपल्या कॅटान्ससाठी कायदे करणे, कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवणे, अंदाजपत्रकाला मंजुरी देणे इत्यादी कामे करतात.नागरिकाची सभा विधीमंडळासारखे कार्य करते जगातील अन्य राष्ट्रात ही पध्दती अस्तीत्वात नाही.

**५. सार्वमत (Plebscite)**

एखाद्या राजकीय विषयावर किंवा प्रश्नावर लोकांचे मत जाणुन घेण्याचा प्रक्रीयेला सार्वमत म्हणतात.सार्वमत जननिर्णयासारखीच प्रक्रीया आहे.पण दोघात मुख्य फरक असा की जननिर्णय विधेयकावर घेतला जातो.कोणत्याही सामान्य किंवा घटनादुरुस्ती विधेयकावर केलेल्या जनमत संग्रहाला जननिर्णय म्हणतात.उलट विधेयकाव्यतिरिक्त एखाद्या महत्वाच्या राजकीय प्रश्नावर जेव्हा जनमत संग्रह केला जातो.तेव्हा त्याला सार्वमत म्हणतात.अशा तेज्हेने प्रत्यक्ष लोकशाहिची स्वित्झलॅडमधील प्रत्यक्ष लोकशाही यशस्वी होण्याची कारणे यशस्वी साधने आढळतात.

अशाप्रकारे जनमतदर्शन, विधीउपक्रम, लॅन्डजेमिन्डे, सार्वमत होण्यास एक घटक कारणीभुत नसुन अनेक घटक कारणीभुत आहे. आधुनिक काळातील प्रतिनिधीक लोकशाहीच्या युगात स्विर्व्झलंड मध्ये प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग अत्यंत यशस्वीरित्या राबविल्या जातो त्याची कारणे खालीलप्रमाणे-

**१) भौगोलिक स्थिती :-**

स्विर्व्झलंड युरोपात मध्यभागी असुन एक छोटा देश असुन त्याची लोकसंख्या मर्यादीत आहे. विशिष्ट भौगोलीक रचनेमुळे स्विर्व्झलंड छोट्या-छोट्या कॅटान्समध्ये विभागलेले आहे. लोकसंख्या कमी असल्यामुळे नागरिकात परस्पर स्नेह भावनिक संबंध असतात त्यामुळे सर्व नागरिक एकत्र येवुन परस्पर विचार विनीमय करुन आपल्या राजकीय जीवनासंबंधी निर्णय घेवु शकतात. चारही बाजुने पर्वत आणि अन्य नैसर्गिक संरचनेमुळे तेथील नागरिक स्वत:स सुरक्षित समजतात.

**२) स्विर्व्झलंड च्या नागरिकाचे चारित्र्य :-**

प्रत्यक्ष लोकशाहीच्या सफलतेचे प्रमुख रहस्य स्विर्व्झलंड च्या नागरिकाचे उच्च कोटी चारीत्र हे आहे.

**३) राष्ट्रीय एकतेची भावना :-**

स्विर्व्झलंडच्या लोकात जात, भाषा आणि धार्मिक भिन्नता असुनही राष्ट्रीय एकात्मता आहे.

**४) व्यक्तीपुजेचा अभाव :-**

लोकशाहीत व्यक्तीपुजा घातक आहे.स्वित्स मध्ये बहुल कार्यपालीका असुनही तीथे व्यक्तीपुजा हा प्रकार नाही.

**५) शिक्षणाचा व्यापक प्रसार :-**

स्विर्व्झलंड मधील जवळपास सर्वच लोक शिक्षित असून ते शांत बुध्दीने निर्णय घेतात.राजकारणी लोक त्यांची दिशाभूल करु शकत नाही त्यामुळे प्रत्यक्ष लोकशाही यशस्वी होऊ शकली.

**६) तटस्थेचे धोरण :-**

स्विर्व्झलंडने कायम तटस्थतेचे धोरण स्विकारले आहे.त्यामुळे आंतरराष्ट्रीय घडामोडी व मत मतांतराचा प्रभाव स्वित्स नागरिकावर पडत नाही.शासनाला आंतरराष्ट्रीय समस्या आणि परराष्ट्र व्यवहाराकडे लक्ष द्यावे लागत नाही.परिणामी शासनकर्ते आपली संपुर्ण शक्ती अंतर्गत राज्य कारभारावर खर्च करतात.तटस्थतेच्या धोरणामुळेच स्वित्झ लॅंडच्या प्रत्यक्ष लोकशाहीला यश मिळाले आहे.

**७) आर्थिक विषमतेच्या अभाव :-**

स्विव्झ मध्ये गरीब-श्रीमंत असा भेदभाव दिसत नाही. व्यापक प्रमाणात आर्थिक विषमतेच्या अभावामुळे तेथे लोकशाही संस्था यशस्वी होऊ शकली.

**८) राजकीय पक्षपध्दतीच्या दोषाचा अभाव :-**

स्विव्झ मध्ये राजकीय पक्षपध्दतीत दोष नाही. राजकीय पक्ष सुरवातीपासुन नाही त्याच्या प्रभाव कमी आहे.त्यामुळे नागरिक विचार करुन निर्णय घेवु शकतात.

**९) प्रसार माध्यमाचे स्वातंत्र :-**

स्विर्व्झलंडमध्ये प्रसार माध्यमांना स्वातंत्र्य आहे.प्रत्यक्ष लोकशाहीच्या यशस्वीतेत प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य महत्वाचे आहे.

**१०) सामाजिक जडण-घडण**

स्विर्व्झलंड मध्ये भाषीक व धार्मीक संघर्ष दिसत नाही प्रबळ राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकत्र आलेला हा समाज आहे आणि प्रत्यक्ष लोकशाही या समाजाची राजकीय जीवनशैली आहे. स्वित्स समाजाची जडण-घडण समुह भावनेवर आधारीत असुन प्रत्यक्ष लोकशाही त्यासमुह भावनेचा मुख्य आधार आहे. म्हणुन स्वित्स मध्ये प्रत्यक्ष लोकशाही यशस्वी ठरली.

अशाप्रकारे वरील बाबीमुळे स्विर्व्झलंड मधील प्रत्यक्ष लोकशाही यशस्वी झ ाली आहे.

**स्विर्व्झलंड मधील राजकीय पक्ष (Political Parties In Switzerland)**

स्विर्व्झलंड मध्ये इतर लोकशाही राष्ट्रप्रमाणे राजकीय पक्ष अस्तित्वात आहे. स्विर्व्झलंड मध्ये संघटीत स्वरुपातील राजकीय पक्षाचा उदय १८ व्या शतकात झाला. आज स्वित्स मध्ये बहुपक्ष पध्दती अस्तिवात आहे. तरी राजकीय पक्ष फारसे प्रभावी नाहीत.पक्ष पध्दतीचा आणि पक्षीय राजकारणाचा परिणाम कायदेमंडळ किंवा कार्यकारी मंडळात फारसा दिसत नाही.पक्ष हिताला महत्वदेण्याऐवजी राष्ट्रहीताला महत्व देण्याची प्रवृत्ती सर्वच राजकीय पक्षात दिसुन येते. स्विर्व्झलंड मधील पक्ष पध्दतीची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहे.

**स्विर्व्झलंड पक्ष पध्दतीची वैशिष्ट्ये :-**

**१. पक्षीय राजकारण आणि स्पर्धेचा अभाव :-**

स्विर्व्झलंड मधील राजकीय पक्ष सत्तास्पर्धेत सहभागी होतांना दिसत असले तरी निवडणुका संपल्यावर ते पक्ष पक्षीय राजकारण बाजुला सारतात आणि राष्ट्रहितासाठी कार्य करतात.

**२. बहुपक्ष पध्दती :-**

स्विर्व्झलंड मध्ये बहुपक्ष पध्दती आहे. प्रमाणबध्द प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीने निवडणुका होत असल्यामुळे स्विर्व्झलंड मध्ये राजकीय पक्षाच्या संख्येत वाढ झाली. स्विस मध्ये १३-१४ राजकीय पक्ष अस्तिवात आहे. त्यापैकी ७ पक्ष प्रमुख असुन ३-४ पक्षाचा प्रभाव सर्वात जास्त आहे. स्विर्व्झलंडच्या फेडरल कॉन्सील मध्ये ३ ते ४ पक्षाचे लोक असतात आणि ते अंत्यत कार्यक्षमतेने सरकार चालवितात.

**३. मुलभुत सिध्दांतबाबत फारसा भेद नाही :-**

स्विर्व्झलंडच्या पक्ष पध्दतीचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे तिथल्या राजकीय पक्षाच्या मुलभुत सिध्दांतात फारसा भेद नाही.सर्व पक्ष लोकशाही गणराज्य, धर्मनिरपेक्षता, तटस्थता, आर्थिक सुरक्षितता, व्यक्तीस्वांतत्र या सिध्दांताला मानणारे आहे.सर्वच पक्ष मध्यम मार्गी असल्यामुळे त्याच्या आर्थिक ध्येय धोरणात फारसा फरक नाही.

**४. महत्वहीन पक्ष व्यवस्था :-**

स्विर्व्झलंडची कार्यपालीका अंत्यत प्रभावशाली व स्थायी असल्यामुळे तिला कोणताही विरोधी पक्ष हटवू शकत नाही व कायदा निर्मिती बाबत पक्ष प्रभावहीन आहे.म्हणून स्विर्व्झलंड ची पक्षीय व्यवस्था महत्वहीन व प्रभाव हीन आहे.

**५. राज्यघटनेची मान्यता नाही. :-**

राज्यघटनेत राजकीय पक्षासंबधी कोणताही उल्लेख आढळत नाही. स्विव्झ र्लिंड मध्ये राजकीय पक्ष अस्तिवात असले तरी त्यांना राज्यघटनेची मान्यता नाही.तरीही स्विर्व्झलंडच्या राजकीय प्रक्रियेत पक्ष सहभागी असतात.

**६. सुसंघटीत पक्षाचा अभाव :-**

स्विर्व्झलंड मध्ये राजकीय पक्ष संघटीत स्वरुपात नाही अनेक पक्षाच्या देशव्यापी संघटना सुध्दा नाही.तसेच अनेक पक्ष वर्षभर कार्य ही करीत नाही राजकीय पक्षानी स्थानिक पातळीपासून राजकीय पातळीपर्यंत आपल्या सुदृढ संघटना निर्माण केल्या नाही.

**७. विरोधी पक्षाचा अभाव :-**

विशिष्ट शासन प्रकारामुळे सत्ता रुढ व विरोधी असा प्रकार स्विर्व्झलंड मध्ये नाही प्रमणबध्द प्रतिनिधीत्वामुळे कोणत्याही पक्षाला सांघीक विधीमंडळात स्पष्ट बहुमत मिळत नाही. सांघीक कार्यपालीकेत सर्व प्रमुख पक्षाला त्याच्या संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळते.त्यामुळे विरोधी पक्ष राहत नाही.

**८. व्यवसायीक राजकारणाचा अभाव :-**

राजकीय नेते व्यवसाय म्हणून राजकारण करीत नाही. तर राजकीय कर्तव्य म्हणून राजकारणात भाग घेतात. राजकारणास धन प्राप्तीचे किंवा उदरनिर्वाहाचे साधन म्हणून राजकारणी नेते पाहत नाही.

**९. पक्षाचे प्रादेशिक स्वरुप :-**

राष्ट्रीय राजकारणाऐवजी कॅटॉन्सच्या राजकारणात स्विस चे नागरिक अधिक लक्ष घालतात.फेडरल असेंब्ली च्या निवडणुका कॅटान्सच्या आधारावर लढविल्या

जातात.संपुर्ण कॅंटान्स एक मतदार संघ असतो. स्विर्झलंड मध्ये निरनिराळे पक्ष कॅंटान्स च्या आधारवर संघटीत झाले असून त्याचे स्वरुप प्रादेशिक पक्षा सारखे आहे.

वरील प्रकारची महत्वपुर्ण वैशिष्टे राजकीय पक्ष पध्दतीची आहे.

**स्विर्झलंड मध्ये राजकीय पक्ष दुर्बल असण्याची कारणे :-**

१. स्विर्झलंड मध्ये कायदेमंडळाचे अधिवेशन कालावधी एक महिन्यापेक्षा जास्त नसतो. एवढया कमी वेळात पक्षीय वातावरण तयार होत नाही.

२. कायदेमंडळच्या सभागृहाला पक्षनिहाय गट करुन बसण्याची व्यवस्था नसते.

३. जननिर्णय व विधीउपक्रमामुळे कायदेमंडळाचे निर्णय अंतिम ठरत नाही.

४. स्विर्झलंड च्या जनतेच्या राजकीय सामाजिक आणि धार्मिक मतभेद फारसे उग्र नाही.

५. स्विर्झलंड मध्ये पराकोटीची आर्थिक विषमता नाही.

६. स्विर्झलंड मध्ये राजकीय पदाचे फारसे फायदे मिळत नाहीत.

७. स्विर्झलंड मध्ये राजकारण हा व्यवसाय नाही.

८. राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्येक स्विस नागरिकाच्या मनात आहे.

वरील कारणामुळे स्वित्झर्लॅंडमध्ये राजकीय पक्ष दुबळे महत्वहीन ठरले आहे.

स्विर्झलंड मधील प्रमुख राजकीयपक्ष

स्विर्झलंड मधील प्रमुख राजकीय पक्ष खालील प्रमाणे आहे.

**१. सोशल डेमोक्रेडीक पार्टी**

१८९० मध्ये स्थापन झालेल्या या पक्षाला सोशॉलिस्ट पार्टी असे म्हणतात.नावा प्रमाणे हा पक्ष समाजवादी विचारणीवर आधारीत असुन मंजुर वर्गाच्या हितसंबधाचे रक्षण करतो आणि त्यांना जास्तीत जास्त सोयी व सवलती मिळवून देणे या पक्षाचे धोरण आहे.हा पक्ष व्यक्ती स्वातंत्र्याला मान्यता देतो. आणि मिश्र अर्थव्यवस्थेचे समर्थन करतो, मजूर वर्गाच्या परिस्थितीत सुधारणा करणे कामाचे तास कमी करणे, सर्वांना सामाजिक सुरक्षितता मिळू शकेल अशी व्यवस्था करणे वाटाघाटीच्या मार्गाने मालक मजूर संघर्ष सोडविणे इत्यादी कार्यक्रम या पक्षाचे आहे. हा पक्ष स्त्रीयांना मताधिकार देण्याचे व संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचे समर्थन करतो.

औद्योगिक कामगारामध्ये हा पक्ष लोकप्रीय असून या पक्षाचे ४० ते ५० सदस्य फेडरल असेंब्ली मध्ये असतात.

**२. रॅडीकल पक्ष**

१८३२ मध्ये उदारवादी पक्षाच्या विभागातुन रॅडीकल पक्ष उदयाला आला. या पक्षाला रॅडीकल डेमोक्रटीक पार्टी असेही म्हणतात. या पक्षाचा मुख्य उद्देश व्यक्तीला जास्तीत जास्त राजकीय स्वातंत्र्य मिळेल अशी लोकशाही राष्ट्रीय राज्याची स्थापना करणे होय. हा पक्ष मध्यममार्गी आहे.त्यामुळे हा पक्ष कधी कॅथालिक पक्षाचे तर कधी समाजवादी दिपक्षाचे समर्थन करतो.केंद्रसरकार शक्तीशाली असावे असे त्याचे पुर्वीचे धरणे होते.कॅथालीक पक्षाचा धार्मिक दृष्टीकोन आणि समाजवादी पक्षाचा उग्र प्रगतीवाद या दोन्ही गोष्टीचा समन्वय रॅडीकल पक्षाने आपल्या ध्येय धोरणात केला आहे.या पक्षाचे ४० ते ५० सदस्य फेडरल असेंब्ली मध्ये असतात.या पक्षाला वेगवेगळया कॅटान्स मध्ये वेगवेगळया नागरिक गटाचा पाठींबा मिळत रहातो.

**३. कॅथालीक पार्टी :-**

कॅथालीक पक्ष हा रुढीवादी असून कॅथालीक चर्चची ध्येय धोरणे व रितीरिवाजाचा समर्थक आहे.यास कॅथलीक कॉन्झरवेटीव्ह पार्टी असेही म्हणतात.याची स्थापना संघराज्य निर्माण होण्यापुर्वीची आहे. ग्रामीण भागात कॅथलीक पंचाची संख्या जास्त असल्यामुळे कॅटान्सला जास्तीत जास्त सत्ता व अधिकार देणे, शेतकरी वर्गाच्या हिताचे संरक्षण करणे, व्यक्तीच्या खाजगी संपत्ती व अधिकाराचे रक्षण करणे, आणि चर्चवर बंधने लावणारे कायदे रद्द करणे हे या पक्षाचे धोरण आहे. बदलत्या काळात या पक्षाची ध्येय धोरणे सुध्दा बदलेली आहे.आता हा पक्ष कॅथलीक कॉन्झरवेटीव्ह ऐवजी कॅथॉलीक डेमोक्रॅटीक पक्ष म्हणवून घेतो.हा पक्ष कामगाराचे प्रश्न हाताळात असला तरी पक्षाचा कल रुढीवादी भांडवलवादा कडे आहे.कॅथलीक पंथाची संख्या जास्त असलेल्या कॅटान्स मध्ये या पक्षाचा चांगला प्रभाव आहे.फेडरल असेंब्ली मध्ये सातत्याने या पक्षाचे ४० ते ५० सदस्य असतात.

**४. उदार पक्ष :-**

१८१८ मध्ये हा पक्ष स्थापन झाला स्विर्व्झलंडच्या राजकीय व्यवस्थेची उभारणी अधुनिक स्विर्व्झलंड ची निर्मिती आणि १८४८ संघराज्यात्मक संघटना लागू करण्यात लिबरल पक्षाचा मोठा वाटा आहे.उदारवादी धोरणानुसार हा परक्ष व्यक्तीस्वांतत्र्याचा कट्टर समर्थक आहे.आथिर्क आणि राजकीय क्षेत्रात व्यक्तीला जास्तीत जास्त स्वांतत्र्य असावे आणि राज्याचा हस्तक्षेप कमी असावा हे या पक्षाच्या ध्येय धोरणाचे मुख्य सुत्र आहे.जिनेव्हा, लुसाने, नाउचॅटल या कॅटान्स मध्ये उदार पक्षाचा प्रभाव दिसून येतो.या

पक्षाचे ४ ते १० सदस्य असेंब्ली मध्ये असतात.या पक्षाला सध्या लिबरल डेमोक्रॅटीक युनीयन असे नाव आहे.

**५. शेतकरी पक्ष :-**

शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्गीय याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणने, शेतकऱ्यांना राज्याकडून आर्थिक मदत देणे, शेतमालाला योग्य भाव ठरवून देणे हे या पक्षाचे धोरण आहे.हा पक्ष मार्क्सवादाच्या विरुध्द आहे.या पक्षाचा प्रभाव प्रोटेस्टंट शेतकऱ्यामध्ये जास्त आहे.या पक्षाचे २० ते २५ सभासद राष्ट्रीय सभेत असतात.३-४ सभासद राज्यसभेत असतात.हे धोरणात समानता असल्यामुळे हा पक्ष नेहमी समाजवादी पक्षा सोबत राहतो.

**६. साम्यवादी पक्ष :-**

हा पक्ष मार्क्सवादी विचारसरनिवर आधारीत आहे.दुसऱ्या महायुध्दाच्या काळात या पक्षावर बंदी घालण्यात आली होती.त्यानंतर या पक्षाने मजूर पक्ष हे नाव धारण केले. स्विस जनता मध्यम मार्गी असल्यामुळे साम्यवादी पक्षाला महत्व मिळाले नाही.सांघीक विधिमंडळात या पक्षाचे ३ ते ५ सदस्य असतात.

**७. स्वंतत्र पक्ष :-**

व्यक्तीच्या आर्थिक जीवनावर राज्याचे नियंत्रण असू नये हे या पक्षाचे मुख्य धोरण आहे.उपभोक्ताच्या हिताचे संरक्षण करणे हे या पक्षाचे उद्देश असल्यामुळे मध्यमवर्गात ते लोकप्रिय आहे.परंतू या लोकप्रियतेच्या आधारावर पक्षाची ध्येय धोरणे नसुन नेत्याचे व्यक्तीत्व आणि वक्तृत्व यावर आहे.फेडरल असेंब्ली मध्ये या पक्षाचे ५ ते १० सदस्य असतात.

या व्यतीरीक्त सेंट्रल डेमोक्रॅट्स, प्रोटेस्टंट पाटी, ॲक्शन पार्टी, इंडीपेंडट सोशॅलीस्ट इत्यादी पक्ष स्विल्झर्लंडमध्ये अस्तीत्वात आहे. हे पक्ष फारसे महत्वपुर्ण नाहीत.२ ते ४ सभासद निवडून आणण्यापलीकडे मजल नाही.

**स्विर्झलंड मधील दबावगट, हितसंबंधी गट**

स्विर्झलंडच्या संविधानातील ३२ व्या अनुच्छेदात फेडरल असेंब्लीतील सभागृहाची समिती आणि हितसंबध गट यांच्यात विचारविनीमय संबधी पध्दतीच्या तरतुदी नमुद केल्या आहे.म्हणजेच वैधानिक दृष्टीकोनातून हितसंबधी गट व दबावगटांना स्वित्झ र्लॅंड मध्ये शासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. स्विर्झलंड च्या राज्यव्यवस्थेत आर्थिक हितसंबधाच्या आधारावर निर्माण झालेले हितसंबंधी व दबाव गट संख्येने जास्त प्रभावशाली

आहे. स्विस मधील दबावगट आपल्या उद्देशाच्या पुर्तीसाठी सनदशीर मार्गाचा अवलंब करतात.ते आपल्या सभासदाच्या मागण्यांना स्विस जनतेचा पांठीबा प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.कारण जनतेचा पाठींबा प्राप्त करुन विधिनियम निर्मिती प्रक्रीया प्रभावित करणे शक्य आहे.याची त्यांना जाणीव आहे.आपल्या संघटनेची बाजू सभागृहाच्या समिती समोर मांडतात.ते आपल्या संघटनेत संबंधीत प्रश्नाबाबत विधिनियम तयार करण्याची आवश्यकता सभागृहाच्या समितीला पटवून देतात. विधेयकाच्या प्रस्तावातील तरतुदी बाबत सभागृहाच्या समितीशी विचार विनीमय करतात.

राजकीय सहभागाचे एक साधन व राजकीय निर्णयप्रक्रिया प्रभावीत करण्याचे एक साधन या दृष्टीने दबावगटाची भुमिका स्विस राज्यघटनेत महत्वाची आहे.

**स्विर्झलंड मधील प्रमुख दबावगट**

स्विर्झलंड मधील प्रमुख दबावगट खालील प्रमाणे आहे.

१. स्विस युनीयन ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्री :-

या दबावगटाच्या दोन प्रमुख संघटना सहभागी आहे. (१) स्वित्स सोसायटी ऑफ मशिनरी मॅनुफॅक्चरर्स् (२) स्वीस वॉच चेंबर

२. स्विस पिजंट्स (फार्मस) युनियन

हा शेतकऱ्याचा दबावगट आहे. शेतकरी व्यवसायाशी संबंधीत (१) वाईन ग्रोवर्स् असोसिएशन वेन्टर्न स्विर्त्झलॅंड. (२) स्विस ब्रफन कॅटल रेस असोसिएशन (३) स्विस असोशिएशन ऑफ प्रोड्युसर्स ऑफ कॅटल फॉर स्लॉटर (४) असोसिएशन ऑफ स्विस मास्टर बुचर्स इत्यादी संघटना यात आहे.

३. स्विस फेडरेशन ऑफ ट्रेड युनियन :-

हा स्विस कामगार संघटनाचा दबावगट महत्वाचा आहे.खालील कामगार संघटना दबावगट म्हणून कार्य करतात.

१. स्विस रेल्वेज एम्प्लॉइज युनियन
२. स्विस फेडरेशन ऑफ कन्स्ट्रक्शन ॲण्ड वुड वर्कस्
३. स्विस फेडरेशन ऑफ मेटल ॲन्ड वॉच वर्कस्
४. स्विस फेडरेशन ऑफ वर्कस् इन कॉमर्स ट्रान्सपोर्टेशन ॲन्ड फुड इंडस्ट्रीज
४. स्विस असोशियन ऑफ आर्टस ॲन्ड क्राफ्टस्

स्विर्झलंड मध्ये लघुउद्योग व गृहउद्योग मोठया प्रमाणावर चालतात.त्यात निरनिराळे कारागीर काम करतात.शिवाय कलाकुसर व हस्तकला व्यवसाय करण्याऱ्याची

बरी संख्या आहे.या कारागीराचा व हस्तकला व्यवसायीकांच्या दबावगट स्विर्झलंड मध्ये आहे.

वरील प्रकारचे प्रमुख दबावगट स्विर्झलंड मध्ये आहे.

**स्विस दबावगटाची वैशिष्टे :-**

स्विर्झलंड मधील दबावगटाची वैशिष्टे पुढील प्रमाणे

**१. राजकीय पक्षाची संबधीत :-**

स्विर्झलंड मधील दबावगट आपल्या हितसंबंधाच्या दृष्टीने एखाद्या राजकीय पक्षाची संबंध ठेवतात.याचा अर्थ असा की जो राजकीय पक्ष दबावगटाच्या हितसंबंधला पोषक असे कार्य करण्यास तयार असतो.अशा पक्षाशी दबावगट संबंध प्रस्तापित करतात.

**२. प्रत्यक्ष लोकशाहीस सहाय्यक :-**

स्विर्झलंड मधील जननिर्णय व विधिउपक्रम मुळे दबावगटांना महत्व आले असुन ते प्रत्यक्ष लोकशाही साठी सहाय्यक ठरले आहे. घटनादुरुस्ती विधेयकावर लोकमत संघटीत करण्याचा दृष्टीने दबावगटाची भुमिका महत्वाची आहे. दबावगटाच्या सुसंघटीत प्रयत्नामुळे जननिर्णय आणि विधि उपक्रम व प्रत्यक्ष लोकशाहीच्या साधने यशस्वी ठरली आहे असे म्हटले जाते.दबावगटामुळे अनेक कायदे प्रभावित होते असतात.म्हणुन फेडरल कॉन्सील एखाद्या विधेयकाचा मसुदा तयार करतांना दबावगटाशी विचार निनिमय करीत असते.

**३. राजकारणाचे गैर व्यावसायीकरण :-**

स्विर्झलंड मध्ये विधीमंडळाचे सभासंदाना स्वत:चा चरीतार्थ चालविण्यासाठी वेगळा व्यवसायअसा धंदा असतो. त्यांना विधीमंडळाच्या सदस्याने वेतन मिळत नाही. म्हणूनच तेथे व्यावसायिक राजकारणानी लोंकाचा वर्ग नाही.दबावगट निरनिराळया विषयाची आणि समस्याशी संबंधीत अध्यावत माहिती कायदेमंडळाच्या सभासदांना पुरवितात. म्हणून विधी निर्मितीच्या प्रक्रियेत दबावगटाला महत्व स्थान आहे.

**४. स्विर्झलंड मधील दबावगट स्विस मंत्रीमडळ आणि विधीमंडळ यांच्या मध्ये त्यांच्या एखाद्या प्रतिनिधीला प्रवेश मिळावा या दृष्टीने प्रयत्न करतात.**

स्विर्झलंड मध्ये दबावगट असले तरी अमेरीका, ग्रेट ब्रिटन ह्या सारख्या देशामध्ये त्यांना जे महत्व प्राप्त झाले तसे स्विस दबावगटाना प्राप्त झालेले नाही.सिव्स लोंकाचा राजकारणास धंद्याचे स्वरुप देण्यास विरोध आहे.तसेच त्यांना

आंदोलनाचा मार्ग योग्य वाटत नाही म्हणून दबाव गटाच्या कार्याला विशेष महत्व आले नाही.

**प्रत्यक्ष लोकशाही**

४७) प्रत्यक्ष लोकशाहीचाप्रकारकोठेअस्तित्वातआहे ?
(अ) ब्रिटन (ब)भारत(क) स्विव्झलेंड (ड) अमेरिका (क)

४८) स्विव्झर्लंडमध्येप्रत्यक्ष लोकशाहीचीसाधनेकोणती ?
(अ) जननिर्णय (ब)विधिउपक्रम (क) प्रत्यावहन (ड) वरीलसर्व (ड)

४९) विधेयकाबाबतजनतेचेमतआजमावण्याच्याप्रक्रियेलाकाय म्हणतात ?
(अ) विधिउपक्रम (ब) जननिर्णय (क)आवर्तन (ड) वरीलसर्व (ब)

५०) विधिउपक्रमकाय आहे ?
(अ) विधेयकावरीलजनतेचानिर्णय
(ब) कायदातयारकरण्यातजनतेचासहभाग
(क) मतदारांचीप्रतिनिधीकसभा (ड) यापैकीनाही (ब)

५१) अनिवार्यजनमतदर्शनम्हणजेकाय ?
(अ) विधिमंडळाच्या मंजुरीनंतर जनतेचे मत आजमावने आवश्यक नाही
(ब) स्पष्टस्वरूपातविधेयकाचाआराखडासादरकरणे
(क) अस्पष्टस्वरूपातविधेयकाचाआराखडासादरकरणे
(ड)विधिमंडळानेविधेयक मंजुर केल्यानंतर जनतेच मत आजमावणे आवश्यक असते.

५२) लोकप्रतिनिधीला परत बोलवण्याचे साधन कोणत ?
(अ) लेकनिर्णय (ब) विधीउपक्रम (क)प्रारंभिकसभा
(ड) आवर्तन (Re-call) (ड)

५३) अनिर्मितकिंवाअस्पष्टविधिउपक्रमम्हणजेकाय ?
(अ) जनता स्पष्ट स्वरूपात विधेयकाचा आराखडा तयार करून पाठविते (क)
(ब) जनता विधेकावर आपला स्पष्ट निर्णय देते

(क) जनता कशावर विधेयकतयार करायचे
याबाबतीत काही तत्वेविधिमंडळाकडे पाठविते.
(ड) यापैकी नाही

५४) प्रारंभिक सभेला काय म्हणतात ?
(अ) Re-call (ब)Initiative (क) Referendum
(ड) Landusjemimde (ड)

५५) खुल्या जागेतील विधिमंडळ कशाला म्हणतात ?
(अ) लोकनिर्णय (ब)आवर्तन (क) प्रारंभिकसभा
(ड) यापैकीनाही (क)

५६) स्विव्झर्लडमधिलपक्षपध्दतीचाकोणता ?
(अ) एकपक्षपध्दती (ब) बहुपक्षपध्दती (क) व्दिपक्षपध्दती
(ड) यापैकीनाही(ब)

५७) स्विव्झर्लडच्या पक्षपध्दतीची वैशिष्टे कोणती ?
(अ) सैध्दांतीकभेदनाही (ब)सुसंघटितपणाचाअभाव
(क) विरोधीपक्षाचाअभाव (ड) वरीलसर्व (ड)

५८) स्विव्झर्लडमधीलपक्षपध्दतीकोणत्याप्रकारचीआहे ?
(अ) शक्तिशाली पक्ष पध्दती (ब) दुर्बल पक्ष पध्दती
(क) राज्यव्यवस्थेत प्रभावि स्थान (ड) यापैकीनाही

५९) स्विव्झर्लड मध्येविरोधी पक्षाचा अभाव आहे असे का म्हटले जाते?
(अ) येथेविरोधी पक्षाला स्थान नाही
(ब) मंत्रिमंडळात सर्वच पक्षाचे प्रतिनिधीचा समावेश होतो.
(क) येथे एकचराजकीय पक्ष अस्तीत्वातआहे.
(ड) यापैकी नाही (ब)

६०) स्विसमधील राजकीय पक्षांचे स्वरूप प्रामुख्याने कशाप्रकारे आढळते ?
(अ) राष्ट्रीय (ब)स्थानिक (क) प्रादेशिक (ड) यापैकीनाही
(क)

❑❑❑